गुरुवार, 28 जुलै 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 05
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● THURSDAY 28 JULY 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-05 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-10 ● PRICE-5

## बँकांमध्ये 48 हजार कोटी बेवारस

### वारसांना शोधण्यासाठी आरबीआय मोहिम सुरु करणार

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई, 27 जुलै : भारतीय बँकांकडे दावा न केलेली बेवारस रक्कम सातत्याने वाढत आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वार्षिक अहवालानुसार, 2021-22 या आर्थिक वर्षात बँकांमधील दावा न केलेली रक्कम 48,262 कोटी रुपयांपर्यंत वाढली आहे. मागील आर्थिक वर्षात ही रक्कम 39,264 कोटी रुपये होती. आता या बेवारस रकमेचे दावेदार शोधण्यासाठी आरबीआयने मोहीम सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. रिझर्व्ह बँक त्या 8 राज्यांवर आपले लक्ष केंद्रित केले आहे जिथे जास्तीत जास्त रक्कम जमा केली जाते.**

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियानुसार, जर एखाद्या ग्राहकाने त्याच्या खात्यातून 10 वर्षांपर्यंत कोणताही व्यवहार केला नाही, तर त्या खात्यात जमा केलेली रक्कम अनक्लेम केली जाते. ज्या खात्यातून व्यवहार होत नाहीत ते खाते निष्क्रिय होते. दावा न केलेली रक्कम बचत खाते, चालू खाते, मुदत ठेव आणि आवर्ती ठेव खात्यात असू शकते. दावा न केलेली रक्कम रिझर्व्ह बँकेच्या डिपॉजिटर एज्युकेशन अँड अवेयरनेस फंड मध्ये जमा केली जाते.

एनडीटीव्हीच्या वृत्तानुसार, रिझर्व्ह बँकेच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, यातील बहुतांश रक्कम तामिळनाडू, पंजाब, गुजरात, महाराष्ट्र, बंगाल, कर्नाटक, बिहार आणि तेलंगणा/आंध्र प्रदेशमधील बँकांमध्ये जमा आहे. रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की, बँकांनी अनेक जागरुकता मोहिमा राबवूनही दावा न केलेली रक्कम कालांतराने वाढत आहे.



दावा न केलेल्या ठेवींची माहिती सामान्यतः फक्त बँकेच्या वेबसाइटवर उपलब्ध असते. खातेदाराच्या पॅनकार्ड, जन्मतारीख, नाव आणि पत्ता यावरून दावा न मिळालेली रक्कम खातेदाराच्या खात्यात पडून आहे की नाही याची माहिती मिळू शकते.


#### दावा न केलेली रक्कम का वाढत आहे?

अनेक खाती दीर्घकाळ निष्क्रिय पडून असल्याने दावा न केलेल्या रकमेत वाढ होत आहे. दरवर्षी अशा खात्यांतील पैसे डिपॉजिटर एज्युकेशन अँड अवेयरनेस फंडाकडे जातात. बँक खाते निष्क्रिय होण्यामागे अनेक कारणे असू शकतात, जसे की खातेदाराचा मृत्यू, कुटुंबातील सदस्यांना मृताच्या खात्याबद्दल माहिती नसणे, चुकीचा पत्ता किंवा खात्यात नॉमिनी नोंदणीकृत नसणे. जर दावा न केलेल्या खात्याची रक्कम डिपॉजिटर एज्युकेशन अँड अवेयरनेस फंड गेली असेल, तर ती परत मिळवण्यासाठी बँकेशी संपर्क साधावा लागेल.

## अण्णाभाऊ म्हणजे उपजत प्रतिभेचे धनी

आधुनिक केसरी

महाराष्ट्राच्या भूमीत अनेक साहित्यिक-लेखक-कलावंत निर्माण झाले. आपापल्या क्षेत्रामध्ये त्यांनी शिखरे पादाक्रांत केली. परंतु सर्वांच्याच वाटेला समानतेची वागणूक आलेली नाही. मात्र अत्यंत गरीब, शिक्षण शब्दाला कधीच स्पर्श न झालेल्या कुटुंबातून एक महान प्रतिभावंत जन्माला यावा ही तत्कालीन, शोषित समाजासाठी गौरवाची बाब आहे. आणि ते नाव म्हणजे उपजत प्रतिभेचे धनी अण्णाभाऊ साठे होय.



शाळेतील शिक्षणक्रम घेऊनच माणसाला आपला नवीन विकास साधता येतो. हे तत्व जरी खरे असले तरी पूर्णत्वाने ते सत्य स्वीकारता येत नाही. लौकिक जीवनाच्या पर्यावरणातूनही माणसे आपला बौद्धिक विकास घडवू शकतात. अनुभव आणि वेदनेच्या पाठशाळेत काही माणसे इतके काही शिकून जातात की त्यांचे आदर्श पुढच्या पिढीला स्वीकारावे लागतात. याचेच मूर्तिमंत उदाहरण म्हणजे अण्णाभाऊ साठे होय. अण्णाभाऊंनी निर्माण केलेल्या कलाकृतीचा गणितीय भाषेतील आकडा जरी आपण पाहिला तरी जवळपास शतकभर साहित्यकृतींचा समावेश त्यात होत असल्याने आता ते वाङ्मयातून सिद्ध झाले आहे. प्रतिभा ही काही कुणा एकाची मिरासदारी नाही. ना ती बंदिस्त असते कुण्या जात-पात धर्माच्या आवर्तात. ती असते संपादीत, अनुभवसिद्ध अथवा उपजत. तसेच ती असते ऊर्जा असणाऱ्या व्यक्तीत्त्वाच्या उर्मीत. अशाच स्वरूपाची ऊर्जा-उर्मी-अनुभव- इच्छाशक्ती होती अण्णाभाऊ साठे यांच्या व्यक्तिमत्त्वात.




ज्या प्रतिभावंताने इतक्या मोठ्या प्रमाणात साहित्य निर्मिती करून मराठी वाङ्मयाचे दालन समृद्ध केले नाही तर परकीय भाषेतही जाऊन पोहोचण्याचा सन्मान मिळवला अशा साहित्यकर्त्याला मात्र इथल्या पांढरपेशी- ब्राह्मणी समीक्षकांनी दखलपात्र समजले नाही. मात्र तळहातांनी कधी सूर्य झाकला जात नसतो किंवा म्हातारीने कोंबडे कितीही डांबले तरी ते ओरडायचे राहत नाही. असेच अण्णाभाऊंच्या साहित्यकृतीच्या बाबतीत पुढील काळात प्रत्ययास आले आहे. साहित्यसम्राट म्हणून त्यांचा गौरव केला जातो हे त्यांच्या सकस साहित्याचे फलित आहे. अण्णाभाऊ मुलःताच प्रतिभावंत होते, प्रज्ञावान होते. आपल्या दलित शोषित बांधवाबद्दल त्यांच्या मनात अतिव कळवळ होती. म्हणूनच ते आता दलित शोषितांचे आदरणीय स्थान झाले आहे. इतकेच नव्हे तर समग्र मराठी मनात ते विराजित झाले आहेत.

म्हणून अण्णाभाऊंना खऱ्या अर्थाने कोणत्याही चौकटीत कोंदण्याचे काम उपेक्षित बांधवांचा वापर करणाऱ्यांनी करू नये. अण्णाभाऊंची दृष्टी- विचार- चिंतन आणि लेखन यांना जशा मर्यादा नाहीत तसेच त्यांचे व्यक्तिमत्वही कुठल्याही मर्यादेत गुंतवू नये. आपल्या आयुष्याच्या अंतिमकाळी सर्वच वर्ग-वर्ण-वर्चस्ववादी विचार-विचारवंत बाजूला सारून त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचाराकडे आपला मोर्चा वळवला. त्यांनी बदल घडविण्यासाठी घाव घालण्याचा जो मंत्र आपल्या लेखणीतून दिलेला आहे, त्याचे अनुकरण करण्याची आज खरी गरज आहे.

**(शब्दांकन- बाळासाहेब जोगदंड, औरंगाबाद)**

## ईडीचे कारवाईचे अधिकार कायम

### सुप्रीम कोर्टाने पीएमएलए कायद्याविरोधातील याचिका फेटाळली

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** सुप्रीम कोर्टाने पीएमएलए कायद्याविरोधात करण्यात आलेल्या याचिका फेटाळल्या आहेत. सुप्रीम कोर्टाने सक्तवसुली संचालनालयाचे (ईडी) कारवाईचे अधिकार कायम ठेवले आहेत. सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे केंद्र सरकारला दिलासा मिळाला आहे. सुप्रीम कोर्टात पीएमएलए कायद्याविरोधात करण्यात आलेल्या २०० हून अधिक याचिका एकत्रित करत त्यावर सुनावणी घेण्यात आली. याचिकांमध्ये अटकेचे नियम, कारवाईचे अधिकार, जामीनाच्या अटी अशा वेगवेगळ्या मुद्द्यांवर आक्षेप घेण्यात आला होता. न्यायमूर्ती खानविलकर यांच्या खंडपीठाने यावर आज निकाल देत ईडीच्या कारवाईच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब केले.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयावर अनेक प्रकरणांचे भवितव्य अवलंबून होते. ईडीने पीएमएलए कायद्यांतर्गत अनेक राजकीय नेत्यांवर कारवाई केली असून, राजकीयदृष्ट्याही हा महत्वाचा मुद्दा होता. सुप्रीम कोर्टाने निर्णय देताना पीएमएलए अंतर्गत समन्स बजावण्याचा तसेच अटक करण्याचा ईडीचा अधिकार कायम ठेवला. सुप्रीम कोर्टाने ईडीच्या अधिकारांमध्ये कोणताही हस्तक्षेप करण्यास नकार दिला आहे.

सुप्रीम कोर्टाने सांगितले की, पूर्वाश्रमीच्या गुन्ह्यात एफआयआर दाखल नसणे ईडी तपासातील अडथळा ठरु शकत नाही. ईडी अधिकारी सीआरपीसी अंतर्गत पोलीस अधिकारी नाहीत. त्यांच्यासमोर नोंदवलेला जबाब हा पुरावा म्हणून ग्राह्य धरला जातो. याचिकांमध्ये ईडीकडून कारवाई करताना ईसीआयआर दाखवला जात नाही असा आक्षेप घेण्यात आला होता. यावर सुप्रीम कोर्टाने एफआयआर आणि ईसीआयआर यांची तुलना केली जाऊ शकत नाही. ईडीसाठी तो अंतर्गत दस्तऐवज आहे, असे स्पष्ट केले.

## त्या शेतकऱ्यांना ५० हजार रक्कम; सरकारचा निर्णय

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** एकनाथ शिंदे-देवेंद्र फडणवीस सरकारची मंत्रिमंडळ बैठक आज पार पडली. या बैठकीत शेतकरी-विद्यार्थी आणि राजकीय कार्यकर्त्यांच्या दृष्टीने ३ महत्त्वाचे निर्णय घेतले गेले आहेत. राज्य सरकारने राजकीय आंदोलनातील खटले मागे घेण्याचा मोठा निर्णय घेतला आहे. त्याचबरोबर शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर लाभ योजना देताना अतिवृष्टी, पूरग्रस्तांचा देखील समावेश करण्यात आला आहे तसेच शेतकऱ्यांसाठी वीज दरात सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय देखील शासनाने घेतला आहे. दुसरीकडे विद्यार्थ्यांना वाढीव मेडिकल जागा देऊन सरकारने दिलासा दिला आहे. राज्यातील शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांच्या मर्यादेत प्रोत्साहनपर लाभ देण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. सुमारे १४ लाख शेतकऱ्यांना याचा लाभ मिळेल आणि ६ हजार कोटी निधी लागेल. या योजनेच्या अंमलबजावणीसाठी सुमारे १६.८५ लाख शेतकऱ्यांच्या १४.५७ लाख कर्जखात्यांसाठी अंदाजे रु. ५७२२ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

## औरंगाबाद की संभाजीनगर ?

### नामांतराचा विषय आता मुंबई हायकोर्टात; राज्य सरकारच्या निर्णयाला जनहित याचिकेद्वारे आव्हान

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाविकास आघाडी सरकारने औरंगाबाद शहराचे केलेले 'संभाजीनगर' नामांतर बेकायदेशीर असल्याचे म्हणत शिंदे-फडणवीस सरकारने सत्तेत येताच औरंगाबादचे फेरनामांतर 'छत्रपती संभाजीनगर' केले. राज्य सरकारच्या निर्णयाविरोधात जनहित याचिकेद्वारे आव्हान देण्यात आले आहे. औरंगाबादमधील रहिवासी असलेल्या नागरिकांनी नामांतराविरोधात मुंबई हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली आहे. सोमवारी या प्रकरणी मुंबई हायकोर्टात सुनावणी होणार आहे. त्यामुळे राजकारण्यांच्या खेळानंतर नामांतरचा चेंडू आता न्यायालयाच्या 'कोर्टात' गेला आहे.

महाविकास आघाडी सरकारने आपल्या शेवटच्या कॅबिनेट बैठकीत ३० वर्षांपासून अस्मितेचा मुद्दा असलेल्या औरंगाबाद शहराचे नामकरण संभाजीनगर केले. बहुमत नसताना आणि राज्यपालांनी बहुमत सिद्ध करण्याचे सरकारला निर्देश दिलेले असताना राज्य सरकार कॅबिनेट बैठक बोलावू शकत नाही आणि निर्णय घेऊ शकत नाही. त्यावेळी सरकारने घेतलेले निर्णय हे असंविधानिक असतात, असे सांगत नव्या सरकारने संभाजीनगर शहराचे 'छत्रपती संभाजीनगर' असे फेरनामांतर केले. दरम्यान, नामांतरचा हा खेळ खेळण्यापेक्षा शहराच्या विकासकामांवर राजकारण्यांनी लक्ष द्यायला हवे, असे शहरातील काही नागरिकांना वाटते. तर मुस्लिमांची ओळख पुसण्याकरिता हे सर्वस्वी राजकारण चालले आहे, याविरोधात आम्ही रस्त्यावर उतरु, अशी भूमिका औरंगाबाद शहरातील काही गटांनी घेतली आहे.

या सगळ्यात औरंगाबाद शहरातील रहिवासी मोहम्मद मुश्ताक अहमद, अण्णासाहेब खंदारे व राजेश मोरे यांनी राज्य सरकारने केलेल्या नामकरणाविरोधात मुंबई हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली आहे. सोमवारी मुख्य न्यायमूर्ती आणि न्यायमूर्ती मकरंद कर्णिक यांच्या खंडपीठासमोर सुनावणी होणार आहे.

#### शिंदे-फडणवीसांकडून फेरनामांतर

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील सरकारने आपल्या शेवटच्या कॅबिनेट बैठकीत घेतलेल्या निर्णयांना नव्याने स्थापन झालेल्या सरकारने स्थगिती दिली होती. त्यानंतर १६ जुलै रोजी घेतलेल्या कॅबिनेट बैठकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी संभाजीनगर ऐवजी छत्रपती संभाजीनगर नामांतर केल्याचे जाहीर केले. २९ जून रोजी तत्कालीन सरकार अल्पमतात असताना त्यांनी घाईघाईने काही निर्णय घेतले होते. मात्र या निर्णयांबाबत पुढे जाऊन काही कायदेशीर अडचणी निर्माण होऊ नयेत म्हणून आम्ही पुन्हा याबाबतचा प्रस्ताव सादर करण्यास सांगितला होता. आजच्या बैठकीत आम्ही औरंगाबादचे नामकरण छत्रपती संभाजीनगर करण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.








विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

# मृत्यूकडून जीवनाकडे...

विमान आता हवेमध्ये हेलकावे खाऊ लागते. प्रवाश्यांमध्ये भीती निर्माण होते. विमानातील वस्तू, बॅग, नाताळसाठी खरेदी केलेली खेळणी लोकांच्या अंगावर पडू लागतात. अचानक विमानाच्या डाव्या बाजूला बाहेर प्रकाशाचा लोळ दिसतो. ज्युलिअनची आई म्हणते, ' आता सगळे संपले बहुतेक. ' तेच तिच्या आईचे शेवटचे शब्द तिला ऐकू येतात. काही क्षणातच हवेतच स्फोट होऊन विमानाचे दोन तुकडे होतात. ज्युलिअनने सीटबेल्ट बांधलेला असतो आणि आपल्या खुर्चीला ती घट्ट पकडून असते. तिला विमानातून आपण खाली कोसळतो आहोत एवढी जाणीव फक्त होते.

ज्युलिअनला जेव्हा शुद्ध येते, तेव्हा तिला आढळते की आपण एका घनदाट जंगलात पडलेलो आहोत. तिच्या खांद्याचे हाड मोडलेले असते. तेथे जखम होऊन प्रचंड वेदना होत असतात. पायाला दुखापत झालेली असते. उजव्या हाताला दुखापत झालेली असते. ती सुमारे दहा हजार फूट उंचीवरून खाली कोसळलेली असते. एवढ्या उंचीवरून पडूनही ती जिवंत असते हेच खरे तर मोठे आश्चर्य. ' देव तारी त्याला कोण मारी ' असे आपण म्हणतो ते तिच्या बाबतीत अक्षरशः खरे ठरले. पण ती वाचली तरी पुढचा जगण्यासाठीचा संघर्ष अजिबात सोपा नसतो. ती जेथे पडलेली असते ते ठिकाण म्हणजे अमेझॉनचे घनदाट आणि महाभयंकर जंगल. सर्वसाधारण माणसाची जाण्याची हिंमत होणार नाही असे ते ठिकाण. उंचच वाढलेली झाडे. सूर्यप्रकाश क्वचित दिसला तर भाग्य. विषारी साप, वाघ, सिंह इ प्राण्यांची रेलचेल, पिसवा, डास, निरनिराळे चावणारे कीटक यांनी हे जंगल भरलेले. शिवाय हे पावसाळी जंगल. कायम ओली जमीन. रात्री प्रचंड थंडी. अशावेळी या ज्युलिअनच्या अंगावर असतो फक्त एक आखूड स्कर्ट. पायातली एक सॅंडल कुठेतरी हरवलेली असते. एकाच सॅण्डलचा वापर करून ती चालते. निदान तो पाय तो सुरक्षित राहील या आशेने.

सुरुवातीला तिला आपल्या आईची आठवण येते. आपल्या बाजूच्याच सीटवर असणारी आई कुठे असेल ! ती आजूबाजूला फिरून आपल्या आईचा आणि सहप्रवाशांचा शोध घेते पण व्यर्थ. त्या घनदाट जंगलात कोणताही मागमूस तिला लागत नाही. अशावेळी ती थकलेली असते. पोटात प्रचंड भूक असते. तिला एक मिठाईचा बॉक्स सापडतो. कदाचित विमानातूनच कोणाचा तरी पडलेला असावा. ती तेवढा बॉक्स संपवते. तेवढ्यापुरती भूक तर भागलेली असते. त्यातल्या त्यातएक सुरक्षित जागा बघून रात्र तेथे काढायची ठरवते. पण जंगलातील डास, कीटक तिला चावून हैराण करतात. अंगावरच्या पातळ कपड्यांमुळे प्रचंड थंडीलाही तोंड देणे कठीण होते. तशीच रात्र ती काढते. सकाळ होते. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## कृतज्ञ राहण्याची वृत्ती जोपासावी

आधुनिक केसरी

आपापसातील भांडणाचा प्रश्नच उद्‌भवू दिला नाही आणि केवळ सकारात्मक भावना मनात ठेवली तर सर्वांनाच आनंदाची प्रचीती प्राप्त होऊ शकते. जसे की आनंद, कृतज्ञता, समाधान, प्रेरणा आणि अभिमान हे सर्व जेव्हा आपण अनुभवतो, तेव्हाच त्या चांगल्या वाटत असतात. ह्या सर्व गोष्टी आपल्याला चांगले कार्य करण्यास, आपली धारणा विस्तृत करण्यास, आपली लवचिकता वाढवण्यास आणि आपले शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत करतात. जे नातेसंबंधातील प्रत्येकाचे जीवन आनंदाने जगण्यायोग्य, सजग, सक्षम, समर्थ बनवते, आपल्या प्रत्येकाच्या जीवनात हा एक उद्देश असणे आवश्यक असते. आपण आपल्या महत्त्वाच्या, जवळच्या व्यक्तीशी खोटे बोलण्याचा निर्णय घेऊन, आपापसातील भांडण झाल्यानंतर आपण त्यांना नाराज नाही आहोत, असे सांगण्याचा प्रयत्न केला, तरीही तो खोटेपणा फार काळ लपून रहात नाही.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आनंद ही अशी गोष्ट आहे, जी आपण स्वतःसाठी निवडतो आणि आपल्या अस्तित्वानुसार आपले जीवन जगण्याचा मार्ग देखील आपणच निवडतो. जीवनातील घटनांचा आपण कसा अर्थ लावतो, यासोबतच आपली आंतरिक भावना आनंद निर्माण कशामुळे करते, हे समजून घेणे आवश्यक असते. आनंदाच्या अनेक भिन्न व्याख्या असल्या तरी, त्याचे वर्णन अनेकदा सकारात्मक भावना आणि जीवनातील समाधान म्हणून केले जाते. आपल्याकडे जे काही आहे, त्याबद्दल कृतज्ञ राहणे, वर्तमानावर लक्ष केंद्रित करणे आणि आपल्यावर काहीही आणि कोणतेही संकट आले, तरी सकारात्मक राहणे आवश्यक असते, कारण आपल्याला शेवटी आनंद प्राप्त करण्यात ते मदत करू शकते. आपल्या स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवून नातेसंबंधातील प्रत्येक सदस्याच्या बाबतीत आपण ठेवलेला चांगला दृष्टीकोनच निश्चितपणे आनंद देते राहतो.



आधुनिक केसरी

## मौनात नांदतो | स्थितप्रज्ञ ||

करावे चिंतन | साधुनी एकांत ||
मनाशी निवांत | बोलू थोडे ||१||

साधिला जयाने | आत्म्याशी संवाद ||
तोचि परमानंद | भोगतसे ||२||

व्यासंगाचे मुळ | विकारांचा त्याग ||
विषयांचा भोग | घात करी ||३||

देहाच्या सदनी | आत्म्याचा निवास ||
अनुभूती श्वास | नित्य देई ||४||

संसारी राहूनी | वेगळा भासतो ||
मौनात नांदतो | स्थितप्रज्ञ ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# "निरुपण"

आधुनिक केसरी

**पुरविली आळी । जे जे केली ते ते काळीं ॥**
**माय तरी ऐसी सांगा । कृपाळुवा पांडुरंगा ॥**
**घेतलें नुतरी । उचलोनि कडियेवरी ॥**
**तुका म्हणे घांस । मुखीं घाली ब्रह्मरस ॥**

पांडुरंगाचे कृपाळूपण वर्णन करताना जगद्‌गुरू संत श्री तुकोबाराय म्हणतात की, आम्ही जेव्हा जेव्हा जे जे हट्ट केले ते ते हट्ट तेव्हा तेव्हा कृपाळू पांडुरंगाने पुरविले. विठू माऊली सारखं जगात दुसरे कोण आहे, सांगा. एकदा उचलून कडेवर घ्यायला अवकाश, मग पुन्हा पांडुरंग खाली उतरवत नाही. अभंगाच्या शेवटच्या चरणात तुकोबाराय सांगतात की, ही विठू माऊली आम्हाला ब्रह्मरसाचा घास भरविते.




डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

या अभंगात जगद्‌गुरू संत श्री तुकोबारायांनी पांडुरंगाचे कृपाळूपण अतिशय सुंदर रीतीने वर्णन केले आहे. माऊली ज्ञानोबाराय ज्या स्थितीचे वर्णन जो जे वांछील, तो ते लाहो, असे करतात, ती स्थिती पांडुरंग परमात्मा आपल्या भक्तांसाठी निर्माण करतो. आणि मातेच्या लडिवाळपणाने ती विठू माऊली आपल्या भक्तांना ब्रह्मरस म्हणजे ब्रह्मानंदाचा घास भरविते. खरोखर, आपल्या सर्वांकडून त्या रुक्मिणीरमण परब्रह्माची आराधना घडो, ही मंगल कामना!

# आपण मागावे फक्त एका रामाजवळ

आधुनिक केसरी

आपल्या जीवनामधली प्रत्येक क्रिया ही रामाच्याकरिता व्हावी. आपले जगणे देखील त्याच्या सेवेसाठी असावे. किंबहुना, लहान मुलाला जशी आई, मोठ्या मुलाला जसा बाप, बाईला जसा प्रेमळ नवरा, मुनीमाला जसा सज्जन मालक, नोकराला जसा त्याचा स्वामी, एखाद्याला जसा विश्वासू मित्र, तसा रामराया प्रत्येकाला वाटला पाहिजे. म्हणून प्रत्येकाने गोंदवल्यास यावे. भगवंताच्या अस्तित्वाची खरी जाणीव होऊन, त्याच्या अनुसंधानामध्ये जीवनाचा प्रत्येक क्षण कसा घालवावा, हे सगुणोपासनेशिवाय सामान्य स्त्री-पुरुषाला समजणे अशक्य आहे. जगात घडून येणाऱ्या प्रत्येक गोष्टीमध्ये रामरायाची इच्छा काम करीत असल्याचे आपण जाणले पाहिजे. इतकेच नव्हे, तर व्यवहारदृष्ट्या आपण योग्य प्रयत्न केल्यानंतर जे चांगले वाईट फळ मिळेल, ते रामाच्या इच्छेनेच मिळते अशी श्रद्धा ठेवावी. अशी श्रद्धा ज्याच्यापाशी असते, त्याला सुखदुःखाची बाधा होत नाही. सर्व काही राम करतो, खरे कर्तेपण रामाचे, हे नीट लक्षात आणून, भगवंताकडे कर्तृत्व द्यावे आणि आपण मीपणाने नाहीसे व्हावे.



खरोखर, आपल्या रामाला काय कमी आहे ? आपण मागावे फक्त एका रामाजवळ ! तो देईल अथवा न देईल. जे देईल त्यांत समाधान मानावे. दुसऱ्या कोणाच्याही जवळ आपण कधी मागू नये. त्यामध्ये आपल्या उपासनेला कमीपणा आहे. मात्र देणाऱ्याने स्वखुशीने दिले तर ते टाकू नये. माझ्या आयुष्यात मी नामाशिवाय दुसरे साधन केले नाही. माझ्या गुरूंनी मला नामच दिले, तेच नाम मी सर्वांना देत आहे. तुम्ही ते नाम घ्या, तुम्हाला राम खात्रीने भेटेल. तोंडाने नेहमी 'राम राम' म्हणत जा. भगवंताच्या नामामध्ये जीवाचे कल्याण आहे असा माझा अनुभव आहे. म्हणून ते जास्तीत जास्त स्त्री-पुरुषांनी घ्यावे. कोणत्याही कार्याच्या पाठीमागे भगवंताच्या उपासनेचे बळ ठेवा. गाईचे रक्षण आणि तिची सेवा इतर कशासाठी नसावी, फक्त भगवंतासाठी असावी. आपण जे काही करीत आहोत ते सर्व भगवंतासाठी करीत आहो, जी जाणीव राहण्यासाठी त्याचे नाम सतत घेत असावे. ज्या वेळी समाजातली पुष्कळ माणसे अमर्याद विषयासक्त बनतात, त्या वेळी कलियुग सुरू झाले असे समजावे. सज्जनांची बुद्धी भ्रष्ट होऊन ते देखील विषयाधीन बनतात. विषयांची प्राप्ती करून घेण्यासाठी वाटेल ते कृत्य करण्याची त्यांची तयारी असते. अशा वेळी, भगवंताच्या नामाचे माहात्म्य जो सांगतो त्याच्यावर कठीण प्रसंग यायचेच; पण परमात्मा सांभाळतो अशा निष्ठेने जो राहील, तो प्रत्येक संकटातून सहीसलामत पार पडेल यात शंका नाही. म्हणून प्रत्येकाने नामाला चिकटून असावे. जगाचा नाद सोडा आणि भगवंताचे प्रेम जोडा.

**- श्री सद्‌गुरु ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज**

# आला श्रावण आला

आधुनिक केसरी


आला श्रावण आला
उन पावसाचा खेळ
छान रंगात आला

श्रावण महिन्याची वाट सर्वच फार आतुरतेने पहात असतात. कारण सतत पडणाऱ्या पावसामुळे लोकांना बाहेर जाताच येत नाही. आजाराने बेजार असतात. मग श्रावण महिन्याची वाट पहात बसतात. कारण श्रावण महिन्यात उनपावसाचा खेळ सुरू होतो. त्यामुळे मनाला थोडे बरे वाटत असते.

श्रावण महिन्यात
सणांची मांदियाळी
असे सुट्ट्यांची मेजवानी
मुलांसाठी आनंदाची पर्वणी

श्रावण महिन्यात सर्व सण महिलांचे असल्याने महिला वर्गात आनंदाचे वातावरण पसरलेले असते.

हिंदू धर्मात श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व असते. या महिन्यात देवांचा देव महादेवाचे फार महत्व असते महादेवाची पुजा केल्याने भक्तांच्या मनोकामना पूर्ण होते. श्रावण महिन्यात सणांची मांदियाळी असते. नागपंचमी, तसेच महत्वाचा सण म्हणजे रक्षाबंधन तसेच गोकुळ अष्टमी,



स्वातंत्र्य दिन इ. सण लागोपाठ येत असतात. मुलांना सणांच्या दिवशी शाळेला सुट्टी मिळते. त्यामुळे बालचमुही खूष असतो. असे असले तरी श्रावण महिना हा धार्मिक सणांचा महिना मानला जातो.

लोक भक्तीभावाने या महिन्यात उपवास करतात.प्रत्येक देवाच्या दर्शनासाठी जातात. श्रावणात नवीन कामालाही सुरुवात करतात घरी पुजा अर्चा घालतात. श्रद्धाळू लोकं घरी ग्रंथांची पारायण करतात. देवधर्मासाठी हा महिना पवित्र मानला जातो. १ ऑगस्टला  पहिला सोमवार येत आहे आणि याशिवाय त्या दिवशीच विनायक चतुर्थी आहे. त्यामुळे अत्यंत शुभ दिवस तो मानला जातोय. तांदुळ, तीळ, जवस महादेवाच्या पींडीवर मोठ्या भक्तिभावाने वाहिले जातात. तसेच श्रावण महिन्यात शुक्ल पक्षात येणाऱ्या पोर्णिमेला नारळी पौर्णिमा म्हणून ओळखले जाते. समुद्र किनारी मासेमारीचा व्यवसाय करणाऱ्या कोळी बांधवांसाठी हा सण महत्वाचा असतो.  या महिन्यात लोकं पर्यटन स्थळांना भेटी देतात. कारण या महिन्यात निसर्ग हिरवाईने नटलेला असतो. डोंगरातून वहात असलेले छोटे छोटे झरे, उमललेली सुवासिक फुले सर्वत्र हिरवाई दाटलेली अवनी सुंदर असे सृष्टीसौंदर्य मनाला अगदी भुरळ घालत असते. असा निसर्गाचा अनमोल खजाना पहाण्यासाठी लोकांची गर्दी होत रहाते.

निसर्गाची मुक्त उधळण
करत येतो श्रावण
फिटते पारणे डोळ्यांचे
पाहूनी निसर्गाचे अनमोल वरदान.

**-सीमा मंगरूळे, वडूज सातारा**

# मांजरी माथा स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतरही मूलभूत सुविधांपासून कोसोदूर

## रस्त्याअभावी जीवघेणा प्रवास चालूच, तरी सुद्धा प्रशासन व लोकप्रतिनिधी निद्रावस्थेत

आधुनिक केसरी न्यूज

**किनवट :** तालुक्यातील जलधारा ग्रामपंचायत अंतर्गत येणारे पुर्णपणे डोंगराच्या कुशीत वसलेले मांजरी माथा हे गाव. गावाला ना रस्ता, ना वैद्यकीय सुविधा, ना कुठली सरकारी योजना, खरंच आजही वाटते ते फक्त त्यांचे अमुल्य मतदान करायलाच त्यांनी जन्म घेतला.
किनवट हा अतिदुर्गम आणि आदिवासी तालुका म्हणून ओळखला जातो. याच तालुक्यात शिवणी, इस्लापूर परिसरात जलधारा गट ग्रामपंचायत अंतर्गत मांजरी माथा हे संपुर्ण आदिवासी लोकवस्तीचे गाव आहे. हे गाव जलधारा गावापासून ३-४ किमी अंतरावर जंगलात वसलेले असून या गावाला आजपर्यंत पक्का रस्ता मिळाला नाही. येथील युवक सखाराम लोखंडे यांनी ग्रामस्थांच्या मागणीनुसार जिल्हाधिकारी, खासदार, आमदार, वन विभाग व आदिवासी विकास विभागाच्या अधिकाऱ्यांना ही बाब गेल्या पाच वर्षांपासून निवेदनाद्वारे निदर्शनास आणून देत आहेत परंतु अद्याप त्यावर कुठलीच कार्यवाही न झाल्याने ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला आहे.



मांजरी माथा या गावचे १९६१ पासून वास्तव्य असून दळणवळणासाठी पक्का रस्ता नसल्याने वेळेवर उपचार न मिळाल्याने आजपर्यंत १५-२० नागरिकांचा मृत्यू झाला असून अजून किती जीव द्यावे लागतील हा प्रश्न नागरिक विचारत आहेत. आदिवासी तालुक्यातील आदिवासी समाजाची ही अवस्था असेल तर ही महाराष्ट्रासाठी खेदाची बाब असल्याचे बोलले जात आहे.
विशेषतः ही ग्रामपंचायत PESA अंतर्गत असून सुद्धा विकासापासून दुर्लक्षित वर्षोनीवर्ष नेत्यांच्या आश्वासनाच्या आशेने एक-एक दिवस काढत विकास कधी येईल? म्हणून वाट बघून बघून म्हातारे होत आहे. मात्र येथील खासदार, आमदार, स्थानिक लोकप्रतिनिधी अजूनही निद्रावस्थेतच आहेत. हे गाव जंगल माळरानात असून या गावाच्या दळणवळणासाठी पक्का रस्ता नसल्यामुळे स्वातंत्र्यापासून दळण वळण करण्यासाठी येथील आदिवासी ग्रामस्थांना फार मोठा त्रास होत आहे. पावसाळा सुरु झाला की मग तर तारेवरची कसरत करत जीवघेणा प्रवास करावा लागतो. कारण जलधारा लगत असलेले मोठे तलाव या तलावाला येणाऱ्या पाण्याचा प्रवाह खूप जास्त असल्यामुळे पहिल्या एक दोन पाण्यात तलाव 100% भरतो. सध्याला तलाव हे पूर्णपणे भरल्याने ओढ्याला सतत पूर असतो. या पुरातून येथील नागरिक जीव-घेणा प्रवास करत आहे. देशाच्या स्वातंत्र्यानंतरही आम्ही केवळ आदिवासी असल्याने आम्हाला पक्का रस्ता मिळत नसेल तर राज्यपालच काय? राष्ट्रपती किनवटला येऊन गेले तरी त्याचे आम्हाला नवल नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया आदिवासी बहुल किनवट तालुक्यातील जलधारा ग्रामपंचायत अंतर्गत मांजरी माथा येथील ग्रामस्थांनी दिली.



# फर्दापूर येथे शेतकऱ्यांच्या गोठ्यात बांधलेल्या शेळ्या चोरट्यांनी रात्री पळवल्या

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील शेतकऱ्यांनी आपल्या शेतात बांधलेल्या गोठ्यात ७५ हजार रुपये किंमतीच्या १३ शेळ्या अज्ञात चोरट्यांनी रात्री दोन वाजेच्या सुमारास लंपास केल्याची घटना फर्दापूर येथे घडली. यामुळे इतर शेतकरी यांच्यात भिंतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी शेतकऱ्याच्या तक्रारीवरुन अज्ञात चोरट्यांविरूध्द दि.२६ रोजी फर्दापूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शेतकरी उमेश पंढरीनाथ बावस्कर शेतीसोबत जोड धंदा म्हणून शेळी पालन व्यवसाय करतात.
दरम्यान, रविवारी सकाळी बावस्कर हे नेहमीप्रमाणे शेळ्यांना चारण्यासाठी घेऊन गेले होते. त्यानंतर संध्याकाळी त्यांनी १३ शेळ्या शेतातील गोठ्यात नेहमी प्रमाणे बांधून ते घरी आले. रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी गोठ्यात बांधलेल्या ७५ हजार रुपये किमतीच्या सर्व शेळ्या रात्रीच्या वेळी लंपास केल्या आहेत. उमेश बावस्कर हे नेहमीप्रमाणे शेळ्यांना चरायला घेऊन जाण्यासाठी गेले सकाळी गोठ्यात गेले असता त्यांना गोठ्यात शेळ्या दिसून आल्या नाही. त्यामुळे त्यांनी तात्काळ वरखेडी, फत्तेपूर व वडोदबाजार येथील गुरांच्या आठवडी बाजारात शेळ्यांचा शोध घेतला. मात्र, तेथेही त्यांना शेळ्या आढळून आल्या नाही. मंगळवारी त्यांनी अखेर फर्दापूर पोलिस ठाणे गाठून १३ शेळ्या चोरीस गेल्याची तक्रार दिली. त्यांच्या तक्रारीवरुन अज्ञात चोरट्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक पोलिस निरीक्षक देवीदास वाघमोडे, निलेश लोखंडे, प्रकाश कोळी पुढील तपास करत आहे.

# सावळदबारा येथे आरोग्य केंद्रात पदे दोन आणि ड्युटीवर हजर असतो एकच वैद्यकीय अधिकारी

आधुनिक केसरी न्यूज



**सोयगाव :** तालुक्यातील सावळदबारा येथील प्राथमिक आरोग्य केंद्र असूनही अठरा गावाचा बोजा एकाच वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही.पी. राजपूत एकटेच पडत असून रुग्णसंख्या मोठ्या प्रमाणात असल्याने कामकाजाच्या वेळेस केवळ एकच वैद्यकीय अधिकारी येथे हजर राहत असून बाकीचे दोन वैद्यकीय अधिकारी येथे आलेच नाही. आजच्या महागाईच्या युगात गरीब व आर्थिकदृष्ट्या मागास असणाऱ्या चालले आहे. लोकांनाही वैद्यकीय सुविधा मिळाव्यात यासाठी येथील वैद्यकीय अधिकारी सेवेसाठी प्रयत्नशिल असतात यांना पण इतर कामे भरपूर असतात.
सोयगाव येथे मिटिंगला जाणे, कोरोनाच्या लसीकरण परिसरात कँप, औरंगाबाद येथे मेडिसिन आणणे, शवविच्छेदन असे विविध प्रकारचे कामे भरपूर असतात त्यामुळे रुग्णांचा गैरसमज होत असतो की डॉक्टर हजर नाही. डॉक्टर जरी हजर नसले तरी कर्मचारी दवाखाना सुरळीतपणे चालू ठेवत असतात. शासनाने ग्रामीण भागातील नागरिकांना येईल त्या पद्धतीने सेवा बजावत असून या वैद्यकीय सेवेपासून वंचित रहावे लागू नये म्हणून आरोग्य उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्र, अशा अनेक प्रकारच्या शासकीय वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून नागरिकांना देत असून या दवाखान्यामध्ये सर्व अधिपरिचारका, आरोग्य सेवक, लिपिक, औषधी कंपाउंडर, शिपाई हजर राहून सेवा देत असतात पण मुळात या आरोग्य केंद्रात खूपच पदे रिक्त आहेत. सेवा देत असताना लाभ रुग्णास होताना दिसत आहे. या ठिकाणी इतर कर्मचारी आठ तास कंपल्सरी सेवा बजावल्या जात आहेत. गरीब व आवश्यक असणारे लोकांना सेवाचा लाभ पण होत आहे. परंतु प्रशासनाने रिक्त जागा व दोन वैद्यकीय अधिकारी डॉक्टरांची पदे तात्काळ भरण्यात यावी, अशी मागणी सावळदबारा ग्रामस्थांनी केली आहे.

**अशी आहे प्राथमिक आरोग्य केंदाचे हजर कर्मचारी**

वैद्यकीय अधिकारी ०१ हजर, आरोग्य सेवक २ हजर, आरोग्य सेविका ०१ हजर, प्रयोगशाळा तंत्रज्ञान हजर ००, औषध निर्माण अधिकारी हजर ००, कनिष्ठ सहाय्यक हजर ००, परिचर हजर ०१, सफाई कामगार हजर ०० आरोग्य केंद्र सावळदबारा.

**पाच वर्षांपासून रिक्त असलेले पदे**

वैद्यकीय अधिकारी ०२ जागा खाली, आरोग्य सेवक ०२, आरोग्य सेविका ०४, प्रयोग शाळा तंत्रचालक ०१, औषध निर्माण अधिकारी ०१, कनिष्ठ सहाय्यक ०१, परिचर ०४, सफाई कामगार ०२, अधिपरिचारिका ०५, प्रयोगशाळा तंत्रज्ञ ०१, औषध निर्माता ०१, आरोग्य सेवक ०१, परिचर ०४, कनिष्ठ लिपिक ०१, कक्ष सेवक ०१, सफाईगार ०२, शिपाई एकून पदे २१ पैकी रिक्त पदे १२ रिक्त जागा आरोग्य केंद्रात खाली आहे.

# ९ ते १० ऑगस्ट रोजी उस्मानाबाद येथे होणाऱ्या राज्य ॲथलेटिक्स स्पर्धेत ४ खेळाडूंची निवड

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** नुकत्याच झालेल्या जिल्हा क्रीडा संकुल धुळे येथे धुळे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने घेण्यात आलेल्या जिल्हास्तरीय ॲथलेटिक्स अजिंक्यपद निवड चाचणी स्पर्धेत १४ व १६ वर्ष वयोगटात मुला - मुलींमध्ये २ सुवर्ण, ३ रौप्य, १ कांस्य पदक प्राप्त झाले. १४ वर्ष खालील वयोगटातील मुले-मुली लांब उडी मुली - वर्षा पावरा सुवर्ण, यशोदा पावरा रौप्य, प्रीती पावरा कास्य, लांब उडी मुले - हरीओम पावरा रौप्य, मुली ६०मी. ६००मी. - यशोदा पावरा सुवर्ण ६०मी., यशोदा पावरा रौप्य ६०० मी., मुले ६०मी. - हरिओम पावरा रौप्य.
१४ व १६ वर्ष खालील वयोगटातील सहभागी खेळाडू मुले रितेश पावरा, करण पावरा, प्रेम पावरा, महेश पावरा, गुणवंत राजपूत, मूली- दिव्या पावरा, दिशा पावरा. १६ वर्ष मुले-हर्षल माळी, भावेश राजपूत कुणाल पावरा, यश शिंपी, यश जाधव या सर्व विजेत्या व सहभागी खेळाडूंचे संस्थेचे अध्यक्षा श्रीमती भाग्यलक्ष्मी बाविस्कर, संचालिका मानसी बाविस्कर, चेअरमन धीरज बाविस्कर, मानव संसाधन अधिकारी प्रवीण देशमुख, प्राचार्य प्रकाश व्यास, उपप्राचार्य वंशी कृष्णा, सुधाकर महाले, निवेदिता दुबे, शिक्षकत्तर कर्मचारी प्रशिक्षक ज्योती पावरा, शारीरिक शिक्षण शिक्षक योगेश पाटील, क्रीडाविभाग प्रमुख मयुर बोरसे यांनी अभिनंदन व कौतुक केले.

**एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूल शिरपुरचे खेळाडू येणाऱ्या काळात नक्कीच राज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक विजेते होतील.**

**धीरज बाविस्कर**
**चेअरमन, एस.आर.बी इंटरनॅशनल स्कूल शिरपुर**




# प्रा.किशोर बोथरा यांचे दुःखद निधन

आधुनिक केसरी न्यूज

**हिंगोली :** येथील जैन समाजातील समाजसेवक व अनेक शैक्षणिक, धार्मिक, सामाजिक अन् राष्ट्रीय कार्यक्रमात सेवारत आदर्श कॉलेज चे प्रा.किशोर भवरीलाल बोथरा यांचे आज भल्या पहाटे पुणे येथे अल्पश्या आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्यांचे वय ६७ वर्ष होत.
त्यांच्या पश्चात त्यांचे वडील जैन समाजातील ज्येष्ठ व्यक्ती (९३) भवरीलालजी बोथरा, बंधु प्रा.विजय, दिलीप मुलगा आलोक (चार्टर्ड अकौटंट पुणे) दोन मुली, एक बहिण, सूना, जावई, नातवंडे आदी मोठा परीवार आहे. बालपणापासून



ते सर्वांचे प्रिय होते. सुस्पष्ट, रोखठोक व आत्मियतेने वागणारे समाजप्रिय, विद्यार्थी प्रिय व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांची कीर्ती होती. त्यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी हिंगोली येथे आणण्यात येणार असून त्यानंतर अंत्यसंस्कार केल्या जाणार आहेत. अलीकडेच ते त्यांच्या मुलासोबत पुणे येथे राहत होते. त्यांच्या दुःखद निधनाने विविध क्षेत्रातील मंडळींनी शोक व्यक्त केला. सेवाभावी, हरहुन्नरी व्यक्तीमत्वास मुकल्याचे म्हटले आहे.



# सागरी मार्ग केंद्राकडे ?

आधुनिक केसरी

मुंबई ते विरार अंतर कमी करत वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) वर्सोवा ते विरार सागरी सेतू प्रकल्प हाती घेतला होता. ४२.२७ किमीच्या या सागरी सेतू प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू असताना, लवकरच कामास सुरुवात होण्याची शक्यता असताना हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प केंद्र सरकारकडे सोपवला जाण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प केंद्र सरकारकडे द्यावा अशी मागणी काही महिन्यांपूर्वी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी राज्य सरकारकडे केली होती. आता ही मागणी मान्य करून प्रकल्प केंद्र सरकारकडे सोपवण्यास राज्य सरकार सकारात्मक आहे. प्रकल्प केंद्राकडे हस्तांतरित करण्याच्या दृष्टीने जोरदार हालचाली सुरू आहेत. मुंबई आणि एमएमआर च्या बऱ्याचशा भागाला मोठा समुद्र लाभला आहे. अशावेळी मुंबईतील रस्ते वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी जलवाहतुकीचा वा सागरी सेतूचा पर्याय का पुढे आणू नये या विचारातून सागरी सेतू प्रकल्प हाती घेण्यात आला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास मंडळामार्फत (एमएसआरडीसी) नरिमन पॉईंट ते वांद्रे असा सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. यातील नरिमन पॉईंट ते वरळी सागरी सेतू प्रकल्प काही कारणाने होऊ शकला नाही. मात्र वरळी ते वांद्रे सागरी सेतू पूर्ण झाला आणि सध्या तो वापरात आहे. वाहतूक वेगवान होण्यासाठी सागरी सेतू हा उपयुक्त पर्याय ठरत आहे. त्यामुळे एमएसआरडीसीने मुंबईतील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी वरळी ते वांद्रे सागरी सेतूचा विस्तार वर्सोव्यापर्यंत करण्याचा निर्णय घेतला. या प्रकल्पाचे काम सध्या सुरू आहे. एमएसआरडीसीने वांद्रे ते वर्सोवा सागरी सेतूचाही विस्तार करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार वर्सोवा ते विरार असा ४२.२७ किमीचा सागरी सेतू बांधण्याचा निर्णय घेण्यात आला. हा सागरी सेतू पूर्ण झाल्यास वरळीवरून थेट विरारला वेगात पोहचता येणार आहे. वर्सोवा ते विरार हे अंतर केवळ ४५ मिनिटांत पार करता येणार आहे. महत्त्वाकांक्षी अशा या प्रकल्पाच्या आराखड्याचे काम सध्या सुरू असून येत्या वर्षभरात आराखडा तयार होण्याची शक्यता आहे. असे असताना हा प्रकल्प राज्य सरकार, एमएसआरडीसीकडून केंद्र सरकारकडे जाण्याची शक्यता आहे. कारण केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी काही दिवसांपूर्वी एका कार्यक्रमात वर्सोवा ते विरार सागरी सेतू प्रकल्प केंद्र सरकारकडे द्यावा अशी मागणी केली होती. त्यानंतर अवघ्या काही दिवसांतच सरकारने या मागणीला सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्यानुसार हा प्रकल्प केंद्र सरकारकडे देण्याबाबत एक सादरीकरण नुकतेच करण्यात आले.

# भयग्रस्त साहेब : संशयीवृत्तीने पछाडले आहेत



प्रकाश महागावकर
संपर्क क्र. 9422007361

आधुनिक केसरी

**राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत विरोधी पक्षांचे जवळपास 208 आमदार खासदार फुटले आणि पंधरा मते बाद केली गेली. त्यामुळे साहेब आत्मचिंतनात गुंतले. आणि साहेबांचे लक्षात आले की दुसऱ्यासाठी खोदलेल्या खड्डयात सुप्रियाताईंचे भवितव्य पडण्याची दाट शक्यता निर्माण होत आहे. आणि कांही आपल्याच पक्षाचे लोक फावडी घेऊन तयारीत आहेत, खड्डा बुजवण्याचे. तातडीने त्यांनी राष्ट्रवादीचे सर्व सेल खालसा केले. आता साहेबांना ज्यांचा ज्यांचा संशय आहे पक्ष विरोधात जाण्याचा, त्या-त्या संशयितांना वगळून साहेब नव्याने सर्व शाखांची पुनर्स्थापना करतील.**

परवा श्री. शरदराव गोविंदराव पवार साहेब यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सर्व शाखा (सेल) बरखास्त केल्या. शिवसेनेच्या झालेल्या वाताहतीची सुरूवात, मुहूर्तमेढ साहेबांनीच केली. साहेब स्वतः किंवा त्यांनी सध्या पाळलेला पोपट मीटकरी नावाचा आमदार यांनी कितीही नाही म्हंटल तरी शिवसेनेतील उठावाला राष्ट्रवादीच जबाबदार आहे. संजय राऊत तर भाडोत्री विश्व प्रवक्ता म्हणून तेल ओतायचे आणि काडी लावायचे काम करत होते. संजय राऊत अनशन बकत आहेत. वाट्टेल ते तारतम्य सोडून निरर्थक बडबडत आहेत.

मिटकरी हे दादाचे भाट आहेत. ते राष्ट्रवादीत उठाव झालाच तर साहेबांऐवजी दादांसोबत जातील. पण राज्यसभा, विधान परिषद या निवडणूकांमध्ये भाजप विरोधात महाविकास आघाडीची जी हार झाली, जो डावपेचात्मक पराभव झाला. त्यामुळे सर्वच भाजप विरोधी पक्ष सध्या एकमेकांकडे प्रचंड संशयाने पाहात आहेत. कोणाचेच पायपोस कोणात नाहीत. शिवसेनेचे 41 आमदारांनी उठाव केला. नंतर शिवसेना प्रमुखांना भेटून, सर्व अठरा शिवसेना खासदारांनी एनडीएच्या उमेदवार श्रीमती द्रौपदी मूर्मू यांनाच पाठिंबा द्यायला भाग पाडले. तरीही साहेबांचे संपूर्ण प्रभावाखालील संजय राऊत यांनी परत उपराष्ट्रपतीपदाचे निवडणुकीत विरोधी पक्षाच्या उमेदवार मार्गारेट अल्वा यांनाच पाठिंबा देण्याच्या मनोदयातून संजय राऊत यांना सतरा विरोधी पक्षांचे संयुक्त बैठकीला पाठवले. ज्यात मार्गारेट अल्वा यांनाच उमेदवार म्हणून घोषित करण्याचा निर्णय झाला. परिणामी सेनाप्रमुख ऐकत नाहीत असे पाहून बारा सेना खासदारांनी स्वतंत्र गट तयार करून लोकसभा अध्यक्षांना तसे पत्र देऊन वेगळा गट स्थापन करण्याचे विनंती पत्र दिले. शिल्लक आठपैकी किमान चार खासदार, गजानन किर्तीकरांसह शिंदे गटात जातील.

राष्ट्रपती पदाच्या निवडणूकीत विरोधी पक्षांचे जवळपास 208 आमदार खासदार फुटले आणि पंधरा मते बाद केली गेली. त्यामुळे साहेब आत्मचिंतनात गुंतले. आणि साहेबांचे लक्षात आले की दुसऱ्यासाठी खोदलेल्या खड्ड्यात सुप्रियाताईंचे भवितव्य पडण्याची दाट शक्यता निर्माण



होत आहे. आणि कांही आपल्याच पक्षाचे लोक फावडी घेऊन तयारीत आहेत, खड्डा बुजवण्याचे. तातडीने त्यांनी राष्ट्रवादीचे सर्व सेल खालसा केले. आता साहेबांना ज्यांचा ज्यांचा संशय आहे पक्ष विरोधात जाण्याचा, त्या-त्या संशयितांना वगळून साहेब नव्याने सर्व शाखांची पुनर्स्थापना करतील.

मुख्य म्हणजे आयुष्यभर विविध घराण्यांमध्ये, विरोधी राजकीय परिवारात जी फूट पाडत आसुरी आनंद उपभोगला, त्याचे प्रतिक्रियात्मक परिनाम आता पवार घराण्यापर्यंत पोहोचत आहेत याची जाणीव आता साहेबांना झाली आहे. सुप्रियाताईंना विरोध असणारे दोन पवार आणि एक महिला पवार संधीच्या शोधात आहेत. कोणत्याही क्षणी पवारांमध्ये उभी फूट पडेल.

मी शालेय जीवनात पंधरा ऑगस्ट आणि सव्वीस जानेवारीला काढण्यात येत असलेल्या प्रभातफेरीमध्ये "भारतमाता की जय!, भारत देश कोणाचा, तेहतीस कोटी जनतेचा" अशा घोषणा देत असू. त्यावेळी खरोखरीच भारताची लोकसंख्या तेहतीस कोटी होती. हिंदूंचे देवही तेहतीस कोटी आहेत. त्यामुळे त्यावेळी तेहतीस कोटी जनतेची काळजी घ्यायला तेहतीस कोटी देव होते. त्यामुळे पाप-पुण्याचा हिशोब पूढील जन्मात फॉर्वर्ड होत असे. पण आता भारताची लोकसंख्या एकशे तेहतीस कोटी झाली आहे आणि देव तेवढेच तेहतीस कोटी आहेत. त्यामुळे प्रत्येक देवावर चार ते पाच भारतीयांची जबाबदारी पडली आहे. त्यामुळे देवांनी फर्मान काढले आहे की आता पाप पुण्याचा हिशोब त्या जन्माचा त्याच जन्मात भोगायचा आहे. आता काहीही कॅरी फॉर्वर्ड होणार नाही. त्यामुळे संचीत ही संकल्पना संपूष्टात आणली असून सर्व कर्मभोग प्रचलीत आयुष्यातच फेडायचे आहेत. त्यामुळे जीवन जगताना जाणते अजाणतेपणी जी पापे, कुकर्मे केली आहेत त्याची जबाबदारी स्विकारून सहन करावे लागणारे परिणाम येथेच भोगायचे आहेत. त्या परतफेडीची सुरूवात आता झाली आहे.

सुप्रियाताईंच्या कन्येचे लग्न हा विषय सध्या महत्वपूर्ण आहे. उमेदवार शोध चालू आहे. एका नामांकीत, गर्भश्रीमंत घराण्याच्या मुलालाच ती मुलगी द्यावी, याची देही याची डोळा लेक मुख्यमंत्री झालेली आणि नात मोठ्या घराण्यात सून झाल्याचे पाहण्याची इच्छा बाकी आहे. ती फलद्रूप व्हावी हीच निरानृसिंहाला विनम्र प्रार्थना आहे.

काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस या दोन्ही पक्षांमध्ये चलबिचल चालू आहे, कोण आपला आणि कोण द्रोही हेच कळेनासे झाले आहे. पृथ्वीराज चव्हाण नाराज आहेत. दादा नाराज आहेत. पटोलेंवर पक्षच नाराज आहे. नरेंद्र मोदींची इमेज विरोधकांचे अनेक नेत्यांना कळतच नाही आहे, पण राष्ट्रवादी काँग्रेसचे बारा-पंधरा आमदार आणि चार पैकी दोन खासदार वेगळा विचार करण्याच्या मुडमध्ये आहेत. एकंदर जसजसे वय साथ देईनासे होत जाईल तसतशी साहेबांची तगमग वाढत जाईल. चिडचिड वाढेल. शीघ्रकोप आणि वाकडं बोलणं वाढत जाईल. हा वयानुसारचा स्वभावधर्म आहे.

शिवसेना आता उध्दवजींचे हाती कायद्याने राहील असे मला वाटत नाही. उध्दवजींना पक्ष आणि नेतृत्व टिकवायचे असेल तर शिंदे गाटाशी म्हणजे आपल्याच पक्षाच्या लोकप्रतिनिधींशी जुळवून घ्यावे लागेल. त्यांचे पुन्याईने आणि बाळासाहेबांचे अनन्यसाधारण व्यक्तिमत्वाचे परिणामी हे सर्व बंडखोर शिवसेनेतच राहू इच्छित आहेत. भगवा ध्वज आणि निवडणूक चिन्ह धनुष्यबाण टिकवायचे असेल तर शरणांगती पत्करण्याशिवाय किंवा जुळवून घेण्याशिवाय उध्दवजींसमोर पर्याय शिल्लक नाहीत. महाराष्ट्रातील राजकीय परिस्थिती जोपर्यंत स्थिर होत नाही तोपर्यंत काय काय घडणार आहे ते देव किंवा साहेबच जाणोत.

# बालविवाह : समाजाच्या प्रगतीतील अडथळा



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**मुलींचे कमी वयात होणारे लग्न हे त्यांच्या प्रत्येक प्रकारच्या शोषणाचे कारण बनते. वैवाहिक जीवनातील तरुण मुली लैंगिक हिंसाचाराला बळी पडतात. लहान वयात गर्भधारणा आणि वारंवार मातृत्वामुळे त्यांच्या आरोग्याला हानी पोहोचते. काही वेळा बाळंतपणाशी संबंधित गुंतागुंतीमुळे त्यांचा मृत्यूही होतो. अशा विवाहांमुळे मुलांमधील कुपोषण आणि बालमृत्यूचेही महत्त्वाचे कारण आहे. तसेच बालविवाहामुळे शिक्षणापासून दूर जाणे हा मुलींच्या आर्थिक स्वावलंबनात मोठा अडथळा ठरतो. तरुण वयात, कौटुंबिक जबाबदाऱ्यांपुरते मर्यादित असलेले त्यांचे जीवन त्यांना त्यांचे हक्क जाणून घेण्यापासून आणि जागरूक नागरिक बनण्यापासून रोखते. अशा परिस्थितीत त्यांना सर्व प्रकारच्या अत्याचारांना सामोरे जावे लागते.**

तंत्रज्ञानाच्या विकासाच्या आणि जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रातील प्रगतीच्या या युगातही अनेक सामाजिक दुष्कृत्ये समाजासाठी कलंकच आहेत. या दुष्कृत्यांमुळे मुलींना आरामदायी आणि सुरक्षित जीवन जगण्याचा हक्क तर हिरावला जात आहेच, पण तिचे आयुष्यच हिरावून घेतले जात आहे. जगभरातील मानवी जीवनासाठी, विशेषतः मुलींसाठी, गुदमरल्यासारखे आणि सर्व प्रकारचे दडपण सिद्ध करणारे सर्व गैरप्रकार आजही मोठ्या समस्येच्या रूपात अस्तित्वात आहेत. बालविवाहही या कुप्रथांच्या यादीत आहे. या दुष्कृत्यामुळे मुलींकडून भावी आयुष्याची स्वप्ने हिरावून घेतली जातात आणि शिक्षणाच्या, पुढे जाण्याच्या आणि त्यांचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करण्याच्या आशा बालपणातच नष्ट होतात. त्याचबरोबर या गैरप्रकारामुळे मुलींच्या आरोग्यालाही असंख्य धोके निर्माण होतात.

काही काळापूर्वी आलेल्या 'सेव्ह द चिल्ड्रन'च्या अहवालात बालविवाहासारख्या गैरप्रकारांवर गंभीर चिंता व्यक्त करण्यात आली आहे. 'ग्लोबल गर्लहुड रिपोर्ट 2021 - राइट्स ऑफ गर्ल्स इन डिस्ट्रेस' या जागतिक अहवालानुसार, जगभरात बालविवाहामुळे दररोज 60 हून अधिक मुलींचा मृत्यू होतो. दक्षिण आशियामध्ये दरवर्षी बालविवाहामुळे दिवसाला सहा मुली आणि वर्षभरात दोन हजार मुलींचा मृत्यू होतो. या अहवालात असा दावा करण्यात आला आहे की, दरवर्षी 22 हजारांहून अधिक मुली बालविवाहामुळे लवकर गरोदर राहणे आणि मुलाला जन्म देणे यामुळे मृत्यूमुखी पडत आहेत. याहून चिंतेची बाब म्हणजे 2030 पर्यंत 1 कोटी अल्पवयीन मुलींची लग्ने होतील असा अंदाज अहवालात वर्तवण्यात आला आहे. याचा सरळ अर्थ असा की या गैरप्रकाराचा धोका कमी होण्याऐवजी वाढतच आहे. आनंदी आणि काळजीमुक्त बालपण हा प्रत्येक मुला-मुलीचा हक्क आहे. यासाठी जगातील प्रत्येक समाजाने नव्या पिढीला शिक्षण, सुसह्य आणि सन्माननीय जीवन देण्याची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक आहे आणि मुलांचे बालपण वाचवणे, त्यांच्याशी चांगल्या परिस्थितीची देवाणघेवाण करणे ही आपली जबाबदारी प्रत्येक पालकाने समजून घेणे आवश्यक आहे. पण दुर्दैवाने असे होताना दिसत नाही.

लहान मुलांचे प्राण वाचवण्यात सर्वच बाजू अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे. तथापि, याची कारणे देखील सामान्य आहेत. ते एका धाग्यासारखे गुंफलेले असतात. अशा दुष्कृत्यांच्या बाबतीत, प्रशासकीय हलगर्जीपणापासून सामाजिक भेदभाव आणि आर्थिक मागासलेपणापर्यंतच्या अनेक पैलूंमुळे परिस्थिती आणखी बिकट होते. भारतात बालविवाहाची मुळे खूप खोलवर रुजली आहेत हे खेदजनक आहे. युनिसेफच्या अहवालानुसार बालविवाहाच्या बाबतीत भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे. या यादीत बांगलादेश पहिल्या क्रमांकावर आहे. संयुक्त राष्ट्राच्या अहवालानुसार जगातील प्रत्येक तिसरी मुलगी भारतात आहे. युनिसेफच्या 'बालविवाह-प्रगती आणि संभावना' या अहवालानुसार बालविवाहाच्या बाबतीत भारत जगातील पहिल्या दहा देशांमध्ये आहे. बालविवाह रोखण्यासाठी जनमानसात वातावरण निर्माण करण्याचे अगणित सरकारी प्रयत्न असूनही ही कुप्रथा कमी होण्याचे नाव घेत नाही.

निरक्षरता आणि पुरातन विचारांव्यतिरिक्त, बालविवाहाची वाईट प्रथा ही सामाजिक-आर्थिक परिस्थितीचा परिणाम आहे. काहींना द्यायला हुंडा नसतो, काहींचा सामाजिक दर्जा इतका कमी असतो की त्यांना अत्याचारितांच्या वाईट नजरेपासून वाचवण्याचा एकमेव मार्ग दिसतो तो म्हणजे तिचे लहान वयातच लग्न. कुणाला लहान वयातच मुलाचे लग्न करायचे असते कारण काही वर्षांनी वधू मिळणार नाही, अशी त्यांना भीती असते. त्यामुळेच जागरूकतेचा अभाव



हेही एक कारण असू शकते, पण त्याच्याशी निगडित इतरही अनेक कारणे आहेत, ज्यामुळे कायदे येत राहतात, पण ही अस्वस्थता मूळ धरून आहे. वास्तव हे आहे की आज बालविवाहाबरोबरच अल्पवयीन मुलांची तस्करी, न जुळणारे विवाह यांसारख्या घटनाही वाढत आहेत. त्यामुळे हा केवळ जनजागृतीचा विषय नाही, हे स्पष्ट होते. आर्थिक, सामाजिक आणि सुरक्षेशी संबंधित अनेक पैलू ही अस्वस्थता वाढवतात. यामुळेच डिजिटल जगाच्या जमान्यातही हे दुष्कृत्य कायम आहे. गेल्या काही वर्षांत भारतात शिक्षणाबाबत झालेल्या जागृतीमुळे लोक बालविवाहाचा विचार करू लागले आहेत, असा दावा केला जात असला तरी प्रत्यक्षात ग्रामीण भागातील परिस्थिती पूर्वीसारखीच आहे. कोरोना महामारीमुळे आर्थिक विषमता, सामाजिक असुरक्षितता आणि जीवनाच्या मूलभूत गरजांसाठी निर्माण झालेल्या त्रासदायक परिस्थितीत गेल्या दोन वर्षांत कमी वयात केलेल्या लग्नाच्या घटनांमध्ये पुन्हा वाढ झाली आहे.

संयुक्त राष्ट्रच्या अहवालात असे म्हटले आहे की, गेल्या पंचवीस वर्षांत जगभरात सुमारे 8 कोटी बालविवाह थांबवले गेले आहेत, परंतु कोरोना महामारीमुळे उद्‌भवलेल्या असमानतेमुळे परिस्थिती अधिकच बिघडली आहे आणि त्यामुळे बालविवाहाचे आकडे वाढल्याचे पाहायला मिळत आहे. चाइल्डलाइन इंडियाच्या अहवालात असे म्हटले आहे की, भारतातही महामारी आणि देशव्यापी लॉकडाऊन हे ग्रामीण भागात बालविवाहाचे नवीन कारण असल्याचे सिद्ध झाले आहे. अशा परिस्थितीत अनेक कुटुंबे मुलींच्या जबाबदारीतून मुक्त होण्याचा विचार करू लागतात हे समजणे अवघड नाही. त्यांच्या मुलींचे हात लवकरात लवकर पिवळे करणे हा सर्व प्रकारच्या असुरक्षितता टाळण्याचा उपाय आहे असे दिसते.

तसे पाहिले तर बालविवाहासारखे दुष्टचक्र मुलीचे संपूर्ण आयुष्य वेठीस धरणारे आहे. यामुळेच जगातील प्रत्येक सुशिक्षित आणि सुसंस्कृत समाजात बालविवाहाच्या दुष्टतेकडे मोठे आव्हान म्हणून पाहिले जात आहे. हा केवळ कुटुंबाचा किंवा मुलीचा वैयक्तिक दोष नसून तो एकंदर समाजाच्या प्रगतीत अडथळा आहे. कोणत्याही देशाच्या अर्ध्या लोकसंख्येचे आणि नवीन पिढीचे ढासळत चाललेले आरोग्य आणि सुरक्षितता ही अत्यंत चिंतेची बाब आहे. त्यामुळे बालविवाहासारख्या दुष्कृत्यांचे समूळ उच्चाटन करण्यासाठी आणि हा गैरप्रकार कायम राहण्यामागील लपलेल्या कारणांवर मात करण्यासाठी उपाय सुचवणाऱ्या पैलूंचा विचार समाजानेच केला पाहिजे. कोणताही कायदा सामाजिक मान्यता आणि मान्यतेशिवाय कार्य करू शकत नाही हे समजून घेणे महत्त्वाचे आहे. जोपर्यंत मुलींसाठी सामाजिक सुरक्षितता आणि सन्मानाची परिस्थिती निर्माण होत नाही, तोपर्यंत अशा वाईट गोष्टी फोफावत राहतील.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# ‘वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी’ असे सांगणारे संतश्रेष्ठ सावता महाराज



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी


**देशातील महाराष्ट्रासारख्या या देवभूमीला अनेक रत्न लाभले. ज्यांनी संत साहित्याचे कार्य देशपातळीवर नेले. जसे की संतश्रेष्ठ नामदेव महाराज यांनी पंजाब प्रांतापर्यंत भागवत धर्मांच्या विचारांची पेरणी केली. संत ज्ञानेश्वर महाराज यांनी जगातील सर्वश्रेष्ठ ज्ञानग्रंथ ज्ञानेश्वरीचे सर्व सामान्यांना समजेल अशा सोप्या भाषेत रुपांतर केले व हा ग्रंथ आज जगातील विविध विद्यापीठात ज्ञानार्जनासाठी, अभ्यासासाठी आचरण केला जातो. असेच या महाराष्ट्राच्या पावनभूमीत संतश्रेष्ठ सावता महाराज यांचा जन्म झाला. ज्यांनी आपल्या जीवनकार्यामध्ये लोकजनांना उद्देशून सांगितले की.....,**

**‘वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी’....!**

म्हणजे परमेश्वर (पांडूरंग) पहायचा असेल तर चांगले कर्म करत राहा तुमच्या कर्मातच देव आहे.

महाराष्ट्राच्या पावनभूमीत संत ज्ञानेश्वर महाराज, संत निवृत्तीनाथ महाराज, संत मुक्ताबाई, संत तुकाराम महाराज, संत एकनाथ महाराज, संत रामदास स्वामी, संत गाडगे महाराज, संत गोरा कुंभार, संत चोखा मेळा, संत नामदेव महाराज, संत कान्होपात्रा, संत गजानन महाराज, संत स्वामी समर्थ, साईबाबा, संत अवजीनाथ महाराज, संत सद्गुरु वामनभाऊ महाराज, राष्ट्रसंत भगवानबाबा ई. सह असे अनेक संत महापुरुष, सिद्धपुरुष होऊन गेले. यापैकीच संतश्रेष्ठ सावता महाराज हे एक होय. सौ.नांगीताबाई व श्री. परसुबा यांच्या पोटी संत सावता महाराज यांचा जन्म झाला.

चंद्रभागेच्या तिरावर उभे असणारे त्रिलोकांचे स्वामी पंढरपुर निवासी भगवान पांडूरंग यांची पालखी आरणला सावता महाराजांच्या भेटीला जाते. हा संत परंपरेतील भक्त आणि देव यांचा अलभ्य भेटीचा असा वारसा ज्यांना लाभला असे संतश्रेष्ठ सावता महाराज यांचा जन्म साधारणतः बाराव्या शतकात पंढरपूर पासून काही अंतरावर असलेल्या सोलापूर जिल्ह्यातील आरण या गावी झाला. संत परंपरेचा वारसा चालु ठेवण्यासाठी आपलं संबंध आयुष्य लोककल्याणासाठी समर्पित करणारे संत कवी संतश्रेष्ठ सावता महाराज यांना वारसा हा अध्यात्मिक-धार्मिक कुटूंबियांचा लाभला. कारण त्यांचे आजोबा देवू माळी हे पंढरीच्या विठ्ठलाचे भक्त असून नियमित अजीवन वारकरी होते. शेती हाच कुटुंबियांचा, उपजिविकेचा मुख्य प्रपंचिक व्यवसाय असल्याने कुटूंबातील सर्व व्यक्ती ही शेती करत होते.



लहानपणापासूनच कुटुंब अध्यात्मिक असल्याने सावता महाराज यांचे मन विठ्ठलभक्तीमध्ये रमले. फुले, फळे, भाज्या आदी पिके शेतात पिकवण्याचा त्यांचा पारंपारिक व्यवसाय, भौतिक जिवनात कर्तव्य कर्म करित असताना काया, वाचा, मनाने ईश्वरभक्ती करता येते हा अधिकार सर्वांना आहे.

**न लगे सायास । न पढे संकट । नामे सोपी वाट वैकुंठाची ।**

असा त्यांचा जीवनप्रवासातील अनुभव होता. जनसामान्यांना आत्मउन्नतीचा मार्ग दाखवत असताना धार्मिक प्रबोधन, भक्ती प्रसाराचे कार्य त्यांनी निष्ठेने व्रत म्हणून स्वीकारले.

मानवता हाच खरा धर्म समजून लोकांमध्ये त्यांच्या मनातील अंधश्रद्धेचे तन उपटून काढून समाज मनाची मशागत करण्यासाठी समाज जागृती करण्याच्या उद्दात हेतूने संतश्रेष्ठ सावता महाराज यांनी अनेक असे महत्वपुर्ण अभंग चालू परिस्थितीला उद्देशून रचले ज्याचा तात्कालीन समाजमनावर मार्गदर्शनात्मक परिणाम झाला.

मनापासून शेती करावी, गाई-गुरांना प्रेमाने सांभाळावे, शेतीला पाणी द्यावे, भरघोस पिके काढावी, अडल्या-नडल्यांना मदत करावी, वंचित पिडीतांना घासातला घास भरवावा ही त्यांची मुळ शिकवण. दिन दुबळ्यांना मदत हीच खरी पांडूरंग भक्ती आहे. अशी त्यांची धारणा होती.

अंधश्रद्धा, कर्मठपणा, दांभिकता ह्या समाजविघातक प्रवृत्तीवर प्रहार करताना त्यांनी कोणाचीही भिडभाड न ठेवता समाजाला योग्य असे मार्गदर्शन करुन तत्वचिंतन, सदाचार, निर्भयता, नितीमत्ता, सहिष्णुता, इत्यादी सदगुणांची अमृतवाणीची पेरणी आपल्या शब्दशैलीतून केली.

वारकरी सांप्रदायाचे दैवत पांडुरंगाला प्रसन्न करुन घ्यायचे असेल तर योग, जप, तप, तीर्थ, व्रत वैकल्ये या साधनांची काहीही आवश्यकता भासत नाही. केवळ आणि केवळ अंतकरणातून पांडुरंगाचे अंतःकरण पुर्वक चिंतन हवे हा मुलमंत्र त्यांनी देतांना असे सांगितले की,

**‘योग-याग तप धर्म । सोपे वर्म नाम घेता॥**
**तीर्थव्रत दान अष्टांग। याचा पांग आम्हा नको॥**

आणि आपल्या अभंगाच्या माध्यमातून लोकांना मार्ग दर्शवला.

जनसामान्यांना आत्मउन्नतीचा मार्ग दाखवत असतांना ते म्हणत असत की,

**‘प्रपंची असूनि परमार्थ साधावा। वाचे आळवावा पांडुरंग ।**
**मोट, नाडा, विहीर, दोरी। अवघी व्यापिली पंढरी’**

अनासक्त वृत्तीने ईश्वरार्पण बुद्धीने केलेला प्रपंच परमार्थ होतो, हीच त्यांची जीवननिष्ठा होती. त्यांना मोक्ष-मुक्ती नको होती.

**‘वैकुंठीचा देव आणू या कीर्तनी’....!**

ही त्यांची प्रतिज्ञा होती.

‘स्वकर्मात व्हावे रत, मोक्ष मिळे हातो हात।’
‘सावत्याने केला मळा। विठ्ठल देखियला डोळा।’

या ओळींतून त्यांची जीवननिष्ठाच स्पष्ट होते. त्यांच्या अभंगांत नवरसांपैकी वत्सल, करुण, शांत, दास्य-भक्ती हे रस आढळतात. अशा या संतश्रेष्ठ सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त कोटी कोटी प्रणाम...!

# पत्रकारितेतही भरत जपतोय, माणुसकीची मात्रा, त्यानेच घडवून आणली, आमची काशीची यात्रा

आधुनिक केसरी




आपल्या आयुष्यातील पन्नास वर्षातील, २५ वर्षे पत्रकारीतेचा क्षेत्रात घालवून, पत्रकारीतेतील बातमीदार ते संपादक अशी सर्व पदं यशस्वीपणे सांभाळून, ज्याने आपल्या मनाला दगड बनू दिलं नाही. बातम्या, वार्तांकनं आणि संपादन करतांना, कधी मनाचा तोल ढळू दिला नाही. सवंग पत्रकारीतेचा पदर धरत, कधी कुणाचे लांगुल चालन केलं नाही. आणि, आपल्या मनातला माणुसकीचा निखळ, पारदर्शी झरा कधीही आटू दिला नाही, असं पत्रकारीतेतील एक नाव म्हणजे संपादक भरत चौधरी. जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक परिक्षेत्रामध्ये, भरतने आपल्या कामाचा अमिट असा ठसा उमटवला आहे. पत्रकारीतेत स्वतःची, एक स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. सभोवताली मैत्रीचा खूप मोठा गोतावळा तयार केला आहे. जळगाव जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच दैनिकातून, त्याने कामं केलं आहे. मात्र, ज्या व्यवस्थापनातून तो बाहेर पडला, त्याबद्दल त्याच्या ओठी कधीही कटुतेचा शब्द आला नाही. निघत नाही. त्या व्यवस्थापनातील त्याचे अनेक सहकारी, आजही त्याच्याशी तितक्याच विश्वासार्हतेने बोलू शकतात, हे त्याचं यश आहे, असं मला वाटतं. पत्रकारीतेचा ७×२४ व्यस्त दिनक्रमातही, भरत घरातली त्याची भूमिका निष्ठेने आणि आग्रहाने पारपाडतो, हे मी त्याचा मोठा भाऊ म्हणून अभिमानाने सांगू शकतो. या वर्षी त्याने अनपेक्षितपणे आईला (वय ८०वर्षे) आणि मला (वय ६०वर्षे) जो काशी यात्रेचा, स्वर्णीम, प्रासादिक आनंद दिला, तो माझ्या जीवनातला अत्तर क्षण ठरला आहे. या यात्रेत, श्रावण बाळासारखं, त्याने आईला आणि मला जे जपलं आणि आमच्या पदरी काशी यात्रेचं पुण्य जमा केलं, ते केवळ अलौकीक आहे. त्या आठवणी, मला त्याच्या मातृप्रेमाचा आणि भातृप्रेमाचा परिमळासमान वाटतात. तो दरवळ मला सदैव कृतकृत्य करतो. आणि, बंधू असावा तर भारतासारखा ! हे म्हणायला भाग पाडतो.



विश्वनाथांच्या काशी नगरात, गंगेच्या तिरावरील केदारेश्वर घाटावर आई आणि भरत सोबतचा जीवनाला कृतार्थ करणारा अत्तरक्षण !

आमच्या आईने, या वर्षी वयाची ८० वर्षे पार केली. ती श्रध्दाळू आणि सदैव देवपूजेत रमणारी आहे. दिवसभर किर्तन, प्रवचन ऐकणं. देवाधर्माचं करणं आणि तोच संस्कार आम्हा सर्व कुटुंबियांवर रुजवणं, हेच तिचं काम. गेल्या काही वर्षापासून आईचा काशीयात्रेचा घोषा सुरु होता. नोकरीमुळे आणि कोणतंही धाडस करण्याची वृत्ती अंगी नसल्याने मी ते टाळत होतो. मधली कोरोनाची दोन वर्षे तशी संकटातच गेली. अश्यात एके दिवशी आईने काशी यात्रेचा पुनरुच्चार केला. कोरोनाचं संकट आता कुठे सरलंय, असं म्हणत मी, सहज जबाबदारी झटकली. मात्र, भरतने ते मनावर घेतलं. त्याच्या संपर्कामुळे योगायोगाने त्याला तीन एसीची कन्फर्म तिकिटंही मिळाली. आणि, त्याने आम्हाला आश्चर्याचा सुखद धक्का दिला. ध्यानी मनी नसतांना ५ दिवसात त्याने आम्हाला काशी विश्वनाथ दर्शन, गंगा स्नान, गंगाआरती, प्रयागराज त्रिवेणी संगम दर्शन आणि सारनाथचं भगवान बुध्दांचं दर्शन घडवून त्रिवेणी आनंद योग साधला. या पाच दिवसात, त्याने आमची घेतलेली काळजी आणि जपलेला श्रध्दाभाव त्याच्या मनाच्या मोठेपणाचं दर्शन घडवणारे होते. त्याच्या जिद्द, समर्पण आणि काटेकोर नियोजनावर मोहर उमटवणारे होते.

त्याचं झिझणं - राबणं,
आपण थोडं जाणलं पाहिजे,
लहान भावाचं मोठेपण,
मोठया मनानं मानलं पाहिजे !

माझा लहान बंधू भरत चौधरी याचा आज ४९ वा. वाढदिवस. तो आज वयाच्या पन्नासीत प्रवेश करत आहे, वयाने माझ्यापेक्षा ११ वर्षांनी लहान असूनही, त्याचं मोठंपण मांडण्याचा हा एक अक्षर प्रपंच. मी स्वतः कवी असूनही, कवी उत्तम सदाकाळ यांच्या वरील ओळी आज माझ्या मदतीला धावून आल्या.

कुटुंबात आम्हा चार भावंडात भरत सर्वात लहान. बघता, बघता तो इतका मोठा झाला की, तो आम्हा चौघांच्या परीवारातील एकूण २६ व्यक्तींचा आधारवड झाला आहे. घरातला कर्ता, मेंढ्या झाला. "हम दो - हमारे दो" ची फॅशन सर्वत्र लोकप्रिय होत असतांना, तो २६ लोकांचं शकट लिलया हाकतो आहे. प्रत्येकाची काळजी वाहतो आहे. कोणताही त्रास, दगदग, चिड, राग, हताशपणा न दाखवता. न थकता, न डगमगता. आम्ही ही सारे निर्धास्त होवून त्याच्यावर विसंबून आहोत. इतकं, की कुठल्याही अडचणीला, तोच आम्हाला सर्व प्रथम आठवतो. नंतर, आम्ही देवाला साकडं घालतो. तो एक आज्ञाधारक, संवेदनशील आणि काळजी घेणारा भाऊ म्हणून जे झिझतो, राबतो ते वयाने लहान असूनही, कर्तृत्व म्हणून त्याचं मोठेपणच आहे. आणि, ते मान्य करायला, मी त्याच्याहून ११ वर्ष मोठा असलो, तरी मला कोणताही कमीपणा वाटत नाही. या उलट मला त्याच्या हिमतिचा, ध्यैर्याचा, समर्पणाचा, संयमाचा आणि शौर्याचाही अभिमानच वाटतो. मात्र, आता त्याने स्वतःच्या आनंदासाठी, आरोग्यासाठीही वेळ दिला पाहिजे, हा मी त्याला आदेशच देत आहे.

वडिलांनी त्याचा जन्म झाल्यावर, त्याची कुंडली काढली होती. त्यात भरतला दोनदा पाण्यापासून आणि एकदा हवेपासून धोका आहे असं दर्शविलं होतं. त्याप्रमाणे खरोखर तो, तीनदा जीवघेण्या प्रसंगातून सहीसलामत वाचला. तीन वर्षांचा असतांना तो छताच्या बारीतून खाली पडला होता. मात्र, परमेश्वराने त्याला साधं खरचटूही दिलं नाही. एकदा नाशिकला कुंभमेळ्यात गेलो असता, त्याने गोदामाईत चक्क उडी मारली होती. आईच्या प्रसंगावधानाने तो बुडताना वाचला. तर, तिसऱ्या प्रसंगात शेतातील विहिरीवरील मोटेच्या पाण्याच्या थारोळ्यात पडूनही, तो मावसभावाच्या सजगतेमुळे सुखरुप बचावला. हे आश्चर्य वाटावे असे, कुंडलितील योगायोग आहेत. असं मी विज्ञानाचा विद्यार्थी असूनही मान्य करतो. मात्र, माझ्यातला सश्रद्ध कुटुंब प्रमुख, याला दैवी संकेत मानतो. या कुंडलीतच पुढे लिहलंय, की आयुष्याच्या उत्तरार्धात, भरतला त्याच्या आयुष्यातली सर्वोच्च संधी मिळणार आहे. मला वाटतं तो काळ येण्याचे, हे संकेत असावेत. एक भाऊ म्हणून, मी कुंडलितली ती शक्यता वास्तवात येवो, अशी प्रार्थना या निमित्ताने, त्या परमपिता परमेश्वराकडे करतो.

शालेय जीवनात १०वीत पहिली कविता लिहिणाऱ्या भरतला खरं तर मीच.... "आधी फक्त अभ्यास कर." सांगत, त्याच्यातल्या कवीला संपवला. पुढे मी कवी म्हणून नावारूपाला आलो. तेव्हा त्याचं त्याला केव्हढं कौतूक. त्याच्यातला अकाली थांबलेला कवी, तो माझ्यात शोधत असेल, असं मला कधी कधी वाटतं. पुढे महाविद्यालयीन जीवनात मात्र, भरतने दै.लोकमतचा प्रतिनिधी म्हणून पत्रकारीतेचे धडे गिरवता गिरवता पत्रकारीतेलाच आपले करीयर केले. पुढे एम.ए.(मराठी), एम.ए.(एम. सी.जे)पर्यंत पदव्यूत्तर शिक्षण घेतले. त्याने बातमीदारीपासून पत्रकारीता सुरु करुन उपसंपादक, वरीष्ठ उप संपादक, वृत्त संपादक, ब्यूरोचिफ पदांपर्यंत वाटचाल करत दै.लोकशाही, जनशक्ती, गांवकरी, देशदूत या दैनिकात सेवा करुन पुन्हा एकदा दै.लोकशाही परीवारात पदोन्नतीवर द्वितीय क्रमांकाच्या पदापर्यंत वाटचाल केली. प्रिंट मिडियात सर्व पदं लिलया हाताळून, तो आता डिजिटल मिडियात "शौर्य मराठी" या वाहिनीवर संपादक म्हणून काम पहात आहे.

आमच्या घरात पत्रकारीतेचा कोणताही वारसा नसतांना त्याची ही वाटचाल भुषणावहच आहे. अनेक दिग्गज संपादकांचा स्नेह, मार्गदर्शनाने तो समृध्द झाला आहे. पत्रकारीता करत असतांना ती वास्तव, सकारात्मकच असावी. पुर्वग्रहदुषीत नसावी हा त्याचा ध्यास. यामुळेच गावात तसेच जिल्ह्यातही त्याने अनेक घटनांवर रोखठोख, परखड, भेदक लिहूनही कुणालाही दुखावले नाही, हितशत्रू तयार केले नाहीत हे त्याचे यशच आहे. सर्व जाती, धर्म, पक्ष, संघटनेतील त्याचा विश्वासार्ह वावर, मित्रांचा गोतावळा पाहिला की मला म्हणावेच लागते....." तू तर माझ्याही पुढे गेलास !" दै.लोकशाहीचे सल्लागार संपादक गुरुवर्य धों. ज. गुरव साहेब त्याला आपला प्रिय शिष्य मानतात आणि दै. देशदूतचे संपादक हेमंत अलोणे त्याला आपला लहान बंधूच समजतात. हीच त्याच्या कामाची पावती आहे.

घरातला त्याचा वावरही अतिशय विनम्र, आज्ञाधारक, सोशिक आणि कार्यप्रवण असाच आहे. लहान असूनही तो सतत वडीलकीच्या भूमिकेतून वावरतो. यामुळे त्याचा लहान असण्याचा हक्क हिरवलाय की काय अशी खंतही मला कधी कधी वाटते. आम्ही दोन्ही बंधू सहकुटुंब आजही आई सोबत "देवरुप" सदनात एकत्र (१०सदस्य) राहतो. रामायणातील भरतानं बंधुत्वाच्या ज्या कमाल मर्यादा आखून दिल्या आहेत, त्या तंतोतंत पाळणा-या भरतकडे पाहून माझ्याही मनात आपसूक शब्द येतात...... "बंधू असावा तर भरतासारखा !" आमचे पिताश्री "जिभाऊ" यांनी २००२ मध्ये ह्या जगाचा निरोप घेतला. त्या अंत्यसमयी ते भरतला म्हटले होते...."नाना हळवा आहे, त्याला जप !" यातूनच त्याच्या नेतृत्व आणि कर्तृत्व गुणावर शिक्का मोर्तब होते. दोन वर्षांपूर्वी एका जीवघेण्या आजारात त्याने, माझी ज्या धैर्याने आणि संयमाने काळजी घेतली त्यामुळेच मी आज सुदृढ दिसतो आहे. आमची आई तर कौतुकाने एक ओवी म्हणते....

नाना चाले वाटे,
तेन्हा भरत झाडी काटे.
ऐसा बंधू नही,
जगम्हा भेटावूत कोठे.!

यातून आईची आमच्या प्रतिची निखळ सद्भावना व्यक्त होत असली, तरी ती वास्तवावात तसूभरही कमी नाही, याचा मी साक्षीदार आहे. प्रसिध्दी माध्यमाच्या जगात दोन तप, २५ वर्ष राहून, आजही तो माळकरी-शुध्द शाकाहारी आहे. अनेक मोहाचे क्षण, तो ज्या निर्मोहीपणाने अव्हेरतो ते पाहून, तो माझा भाऊ असल्याचा मला सार्थ अभिमान वाटतो. तो आता ॲड्रॉईड फोन वापरायला लागला आहे. गेली २५ वर्ष तो त्यापासून दूर होता. कदाचित हे आपणास खरे वाटणार नाही. मात्र, हा त्याचा संयम होता. कार्यालयीन कामासाठी उपयोग करावा एव्हढाच, तो रात्रपाळीत संगणकासोबत रहायचा. फेबु, व्हाअ.वरील त्याचा वावर आताशा लक्षणीय वाढला आहे.


भरत ज्या पदावर होता त्यापेक्षा खालच्या पदावर माध्यमात असलेल्या अनेकांशी मी आजही अदबीनं/ बिचकत वागतो. मात्र, याने कधीही आपल्या पदाचा बडेजाव मिरवला नाही. त्याचा अनुचित लाभही घेतला नाही. माझ्या सर्वच मित्रांसोबत वागतांना तो जितका नम्र होतो, त्यांच्यात मलाच पाहतो, आणि ते जेव्हा मला सांगतात, तेव्हा माझी मान अभिमानाने ताठ होते. तो माझ्यापेक्षा लहान असला तरी त्याचा जबरदस्त आत्मविश्वास, धाडस, सकारात्मकता आणि महत्वाचं म्हणजे त्याच्या जगण्या, वागण्यातली पारदर्शकता, यामुळे मला त्याचा वडिलकीसारखाच आधार वाटतो. तो माझा भाऊ, मित्र, सल्लागार एव्हढंच नव्हे तर आदर्शही आहे. "भिऊ नकोस मी तुझ्या पाठीशी आहे ......!" असं म्हणणारा एव्हढा अश्वासक पाठीराखा आहे, म्हणूनच मी खूप निशंक, निर्धास्त मनाने माझे छंद पूर्ण करतो, जगण्याचा आनंद घेतो. आणि आपसूक माझ्या ओठी शब्द येतात "तेरा साथ है तो, मुझे क्या कमी है......!".


भरत आमच्या घरातला आणि मित्र परीवारातला सकारात्मक उर्जेचा एक खळाळता आनंद स्त्रोत आहे. नकार, नैराश्य, अपयश त्याला अक्षरशः घाबरतं. कोरोना काळात दिड वर्षात त्याने कुटुंबियांसह दिडएकशे लोकांचे समुपदेशन केले. दवाखाना, औषधी, ॲम्बूलन्स, ऑक्सिजन, आर्थिक मदत साऱ्या आघाड्या तो सहज हाताळत होता. त्याला ९९ टक्के यशही आलं. १% अपयश म्हणजे आम्ही आमचा जीवलग मित्र शरद बन्सी, यास वाचवू शकलो नाही. मात्र, त्यासाठी भरतने केलेल्या धावपळीचे, सारे धरणगावकर साक्षीदार आहेत.

सध्या "शौर्य मराठी" वाहिनीच्या माध्यमातून, डिजिटल मिडियात रमलेल्या भरतचा हा उत्साह, त्याच्यात सदैव खळाळत राहो, चैतन्य उधळत राहो या सदिच्छा ! लवकरच तो त्याचं स्वतःचं, एक नवं माध्यम घेवून, तुम्हा सर्वांसमोर येणार आहे. त्याच्या भविष्यातील सर्व अपेक्षा साकार होवोत आणि त्याला दिर्घायुरारोग्य लाभो, ह्याच त्याला वाढदिवसानिमित्त आभाळभर शुभेच्छा !!

# काय झाडी, काय हिरवेगार डोंगर, खरंच एकदम आनंद हाय..!

## निसर्गरम्य वातावरणात हिरवाईने नटले कन्नडचे "गौताळा अभयारण्य"





**आला पावसाळा निघूया आनंद घेण्यासाठी "गौताळा"**

वरील घेतलेल्या शीर्षकानुसार ही एक ग्रामीण भागातील म्हण आहे. कन्नड तालुक्यातील अनेक गावातील युवा वर्ग, नोकरदार, नागरिक या अभयारण्यामध्ये येऊन नैसर्गिक आनंद घेत रोडच्या कड़ेला झाडांच्या कुशात जेवणाचा आनंद घेताना दिसत आहे. उन्हाळा संपला आता पावसाळा लागला. रक-रकणारे डोंगर हिरवेगार झालेत. त्यामुळे डोंगर पाहून डोळे तृप्त होत आहेत. अजिंठ्याच्या डोंगरातील म्हणा की साताराच्या रंगात 260,61 चौरस किमी अंतरामध्ये गौताळा अभयारण्य वसलेला आहे. मराठवाड्यातील सर्वात मोठा अभयारण्य हा गौताळाला मानले जाते.

या अभयारण्यामध्ये हरीण, गाय, सायाळ येथे आढळतात. औरंगाबाद शहरापासून 75 किलोमीटर अंतरावर हा अभयारण्य कन्नड तालुक्यात आहे. येथील निसर्गाचा आनंद घेण्यासाठी शालेय विद्यार्थ्यांची बस घेऊन थेट अभयारण्यामध्ये दाखल होते. त्यात यांच्यासोबतच अनेक पर्यटक भेट देण्यासाठी येतात, तसेच सहलीसाठी भेट द्यावी, असे हे ठिकाण डोंगराच्या कपारीतून वाट काढत उंचावरून कोसळणारे धबधबे, उंच उंच डोंगर हिरवेगार डोळ्यात नवस पडतात. पावसाळयात पर्यटनासाठी एकदा तरी भेट द्यावा असाच गौताळा अभयारण्य आहे.

**अभयारण्याची कधी झाली स्थापना व काय आहे अभयारण्यामध्ये..!**

गौताळा अभयारण्याची 1986 साली स्थापन झाली होती, अशी नोंद आहे. कन्नड तालुक्यातील 17 गावातील वन क्षेत्राचा समावेश यात आहे. कन्नडपासून केवळ 15 किमी अंतरावर चाळीसगावपासून 20 किमी अंतरावर असलेल्या फाट्याजवळ गेल्यास भव्य मोठा प्रवेशद्वार लागतो तिथे चौकी आहे. तिथून आत प्रवेश मिळतो. गौताळा अभयारण्यात पायी फिरता येते. येथे बस किंवा स्पेशल परवानगी याची काही सख्ती नाही. पर्यटकांच्या सुरक्षितेची काळजी घेत वनविभागाने अतिशय चांगल्या प्रकारचे ट्रेडिंग व व्यूह पॉइंट तयार केलेले आहेत. पर्यावरण निसर्गप्रेमी, तरुणाई, आनंदायी, उत्साहदायक असाच अभयारण्याचा परिसर आहे. पावसाळ्यात तर या ठिकाणी भटकंती करण्याची मजाच निराळी आहे. हिरवाईने नटलेला परिसर पक्षांचा आवाज मनाला प्रसन्न करतात.

आधुनिक केसरी न्यूज

**सय्यद आरेफ**

**कन्नड : हिरवेगार डोंगर व डोंगरावरुन वाहणारे धबधबे हे सर्वात जास्त सिनेमामध्ये दाखविल्या जातात. मात्र जसा पावसाळा सुरु तसा रियल सीन गौताळा अभयारण्यामध्ये पहावयास मिळतो. औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड तालुक्यातील सर्वात मोठा अभयारण्य "गौताळा" हा मानला जातो. मागील महिंन्यापासून सुरु असलेल्या सलग सरी पावसामुळे हा अभयारण्य हिरवाईने नटून गेला आहे. या अभयारण्यामध्ये महाराष्ट्रातील अनेक नागरिक निसर्गाचा नैसर्गिक आनंद घेण्यासाठी पावसाळयात येत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.**

**अभयारण्यात प्राचीन काळ वस्तु अध्यापही...**

या गौताळा अभयारण्यामध्ये ऐतिहासिक आध्यात्मिक मुक्ती ही अनुभव देतात, कारण येथे चंडीका देवीचे मंदिर, अन्य प्राचीन मंदिर या ठिकाणी दिसतात. चंडिका देवीचे मंदिर अभयारण्याच्या सीमेतच आहे. नवरात्रीच्या वेळी दर्शन घेण्यासाठी या मंदिरात भक्तांची मोठ्या प्रमाणात गर्दी असते. वनातील पितळखोरा येथील प्रसिद्ध लेणी समोर साधी पवित्र जीवन जगणाऱ्या बौद्ध भिक्षुचा निवास एकेकाळी याच वनात होता. चंदिका देवी मंदिरापासून काही मीटर अंतरावर अकराव्या शतकात सिद्धांत शिरोमणी सारखा गणितावरील ग्रंथ लिहिणारे गुरु गणिती खगोल तज्ञ भास्कराचार्यांचे वास्तव देखील याच वनात होते. तसेच सिताची न्हानी म्हणुन एक व्यूह पॉइंट सुद्धा आहे. या ठिकाणी अनेक प्रकारची झाडे व औषधीचा निवासस्थान या ठिकाणी आहेत. चंदनाच्या वनामधून वाहणारा चंदननाला आहे. नाल्याच्या काठावर प्राणी ये-जा करत असतात, तेथे विविध रंगाचे पक्षी मनाला मोहित करतात, रानभाई, सुगरण, बिबट्या, लांडगा, कोल्हा आणि वानर, घोरपड, साप, यांच्यासह प्राण्यास दोनशेहून अधिक पक्षांच्या प्रजाती अभयारण्यात आहेत. त्यांचबरोबर कोतवाल, चंदुर, गरुड, भारद्वाज, धनेश, पोपट, हरियाळ, दाट हिरवाई गवताचा हा परिसर आपणाला भूलवतो, मारुतीचे मंदिर समोर तलाव आहेत. तलावाच्या स्वभावत्याला पूर्ण परिसर गवताळ मनोऱ्यावरून तो पाहता येतो. मारवेल, पाहुण्या, गोंडाळ, धारवाड, कृषी बेटे, गावात कुंदा, शहादा, शिंपी आदी गवताच्या प्रजाती येथे दिसतात. पुर्वी या ठिकाणी गवळी राहत होते. त्यांच्यात गाई परिसरात चरत होते. त्यावरूनच परिसरातील गौताळा नाव पडले, असावे अशी माहिती परिसरात राहणारे नागरिक देत आहे.

तसेच पुढे अभयारण्य कन्नड, चाळीसगाव, नागद क्षेत्रात मुड़तो. सीता खोरी-सीता न्हानी, गौतम ऋषी मंदिर, केदार कुंड, धवत तीर्थ ही पाहण्याजोगी असे आहे. गवताळ तलावाच्या पुढे असलेल्या उंच टेकडीवर एक गुहा आहेत. त्या गुहेत गौतम ऋषींची मूर्ती आहे. इथेच ऋषींनी "तप" केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे टेकडीला गौतम टेकडी नाव पडले आहे. वनपरिक्षेत्रात शासनाचे महत्वकांशी जलयुक्त शिवार अभियान अंतर्गत विविध कामे करण्यात आले आहे. वृक्षलागवड सोबत मोहिमेअंतर्गत मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करण्यात आली आहे. भविष्यात अजून नवरंग परिसरात मोलाची भर पडणार आहे. हंगाम असून निसर्गसौंदर्याचे ठिकाणी गेल्यास आपणास अनुभव येथे पावसाळी पर्यटनाचा आनंद ही मनसोक्तपणे पर्यटकांना घेता येतो. वन्यजीव विभागीय वन अधिकारी विभागामार्फत ही पर्यटकांसाठी विविध सोयी सुविधा केल्या आहेत. पर्यटकांना माहिती व्हावी यासाठी निसर्ग निरीक्षण केंद्र येथे आहेत. आंबा, आवळा, बाम्बू, रुबेल आधी वनसंपदा औषधीची माहिती या केंद्रात आहे.

मराठवाड्यात केवल सुपुष्प वनस्पतींच्या सुमारे 1 हजार 650 प्रजाती आहेत, त्यापैकी पाचशेहून अधिक प्रजातीचा उपयोग औषधीसाठी केला जातो. वनौषधीचा खजिना म्हणून "गोताळा" कड़े सर्वप्रथम पाहिला जातो. जुलै ते जानेवारी हा काळ अभयारण्याला भेट देण्याचा उत्तम काळ मानला जातो. औरंगाबाद-धुळे यांना जोडणारा राज्य महामार्ग 211 भाग जातो. चाळीसगावपासून 20 किमी अंतरावरच्या कन्नडपासून 15 किमी अंतरावर अभयारण्य आहे. हिवरखेडा- पाटणादेवी -पितळखोरा सायगव्हाण दरवाजातून आपण याचा प्रवेश करता येतो. इथूनच हिवरखेडा गेटपासून अजिंठा लेणी 100 किलोमीटर, वेरुळ लेणी 40 किलोमीटर तर दौलताबाद किल्ला 50 किलोमीटर अंतरावर आहे.

औरंगाबाद ते कन्नड डावीकडील आकर्षक पितळखोरी लेणी समूह सह्याद्री पर्वताच्या सातमाळ पर्वत शर्यत असलेल्या गवताळ कोरलेले आहेत पण वन्यजीव विभागाने उत्तम प्रकारे व्यवस्थापन आणि संवर्धन करून जैविविधेतेची जपणूक केली आहे. त्यामुळे पर्यटक, पक्षी अभ्यासक, पर्यावरण प्रेमी यांना यंदाच्या पावसाळ्यातील निसर्ग सहलीचा निर्मितीचा आनंद घ्यायला पहावयास मिळत आहे.

> **गौताळा अभयारण्यामध्ये पावसाळ्यात येण्याचा मोहक वेगळा असतो. अभयारण्यामध्ये दाखल होतच रिमझिम पावसाची सलग सरी सुरुच होते. त्या पावसाचा आनंदच वेगळा असतो. किती ही ताणतणाव, थकवा असल्यावरही अभयारण्यात दाखल होताच मनुष्य नैसर्गिक वातवरण बघताच ताणतणाव मुक्त होण्याचा आनंद लाटण्याचा प्रसंगच वेगळा असतो. त्यात ऊंच ऊंच वाहणारे धब-धबे, राणातुन निघणारे धुके हे तर जणू मनाला स्पर्श करुनच जाते, माझे एक वैयक्तिक मत आहे की एकदा तरी "गौताळा" ची एक गोल चक्कर केलीच पाहिजे.**
>
> **सय्यद सोहेल, निसर्ग प्रेमी कन्नड**

> **पावसाळ्यात अभयारण्यामध्ये निसर्गाचा आनंद घेण्यासाठी पर्यटक दूर-दुरुन येतात. अश्यावेळी सकाळपासूनच युवा वर्ग यांची आवक जावक दिसते तसेच शनिवार, रविवारी तर जास्तच गर्दी असते. पावसामुळे रस्त्यावर मातीचा खच येण्याचे प्रमाण अधिक असतात, मात्र युवा वर्ग दुचाकी सुसाट वेगाने पळवतात, यामुळे मोठा अपघात होण्याची शक्यता आहे. तसेच अभयारण्य परिसरात प्लस्टिक, पन्नी, कागद, पाणी बोटल या सारख्या घान कचरा करू नये. परिसर स्वच्छ ठेवावे, तसेच काही अनुसूचित प्रकार घडत अल्यास त्वरित वनविभागाला माहिती द्यावे.**
>
> **शेळके, वनक्षेत्रपाल**
> **वन्यजीव विभाग कन्नड-नागद**



# पैठण ते दरेगाव बस सुरू; शाळकरी मुलांची बससेवेमुळे गैरसोय झाली दूर

आधुनिक केसरी न्यूज

**आडूळ :** पैठण तालुक्यातील दरेगाव येथील शालेय विद्यार्थ्यांना व विद्यार्थिनींना व नागरिकांना बालानगर येथे शाळेत जाण्यासाठी बस नसल्यामुळे खूप अडचणींचा सामना करावा लागत होता तसेच विद्यार्थ्यांच्या पालकांना दररोज सातत्याने मुलांना शाळेत घेऊन जाणे व परत घेऊन येणे परवडत नव्हते. याची दखल घेत सरस्वती भुवन प्रशाला बालानगर येथील शाळेचे मुख्याध्यापक शिरीष मोरे यांनी पैठण आगार प्रमुख यांना लेखी पत्र देऊन पैठण ते दरेगाव ही बससेवा सुरू करावी अशी मागणी केली होती. दैनिक आधुनिक केसरी वृत्तपत्रात ग्रामीण भागातली लालपरी हरवली, आता बाबा मी कस जाऊ शाळेला या मथळ्याखाली बातमी प्रकाशित करण्यात आली होती. या पत्राची दखल घेत पैठण आगाराचे आगार प्रमुख सुहास तरवडे यांनी शालेय विद्यार्थ्यांचे हित चिंतन लक्षात घेऊन ताबडतोब पैठण ते दरेगाव बससेवा सुरू केली. बस गावात येताच मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलून आले. गावकऱ्यांच्या व विद्यार्थी यांच्या वतीने बस चालक पी.एम. अकोलकर, वाहक एस.व्ही. फुलझळके यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी मा. सरपंच गणेश नलावडे, उपसरपंच संतोष नलावडे, ग्रामसेवक रामेश्वर तांबे, संतोष मैंद, रवी बोरूडे, निवृत्ती नलावडे, काकासाहेब सपकाळ तसेच गावातील ग्रामस्थ व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# लायन्स क्लब ऑफ पुसद सिटीच्या कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा उत्साहात

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** आंतरराष्ट्रीय स्तरावर समाज उपयोगी उपक्रम राबविणाऱ्या अनेक संघटना कार्यरत आहेत. अशातीलच एक संघटना अर्थात लॉयन्स क्लब. जगाच्या पाठीवरील अनेक देशांमध्ये या लॉयन्स क्लबच्या शाखा आहेत, या सर्व शाखांच्या माध्यमातून अनेक ठिकाणी समाज उपयोगी उपक्रम राबविले जात असतात. त्याचाच एक भाग अर्थात लॉयन्स क्लब ऑफ पुसद सिटी. गेल्या काही वर्षांपूर्वी पुसद अर्बन बँक पुसदचे कार्यकुशल अध्यक्ष शरद मैंद यांच्या मार्गदर्शनाखाली या क्लबची पुसद येथे स्थापना करण्यात आली.

जवळपास 50 सदस्य असलेला हा क्लब पुसद परिसरामध्ये अनेक समाज उपयोगी उपक्रम राबवित आहे. क्लबच्या प्रोटोकॉलनुसार दरवर्षी नवीन कार्यकारीणी केल्या जात असते. 2022-23 साठी लॉयन्स क्लब ऑफ पुसद सिटी च्या कार्यकारणीची निवड करण्यात आली.

लायन्स क्लब ऑफ पुसद सिटीच्या कार्यकारिणीचा नववा पदग्रहण सोहळा रविवार दिनांक 24 जुलै 2022 रोजी जंगल रिट्रेट रिसॉर्ट, उमरेड येथे एमजेएफ लॉयन विनोद अदलखिया यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी लॉयन्स क्लब ऑफ पुसद सिटीचे डायरेक्टर शरद मैंद, डिस्ट्रिक्ट कॅबिनेट ऑफिसर लायन डॉ. जय भोपी, झोन चेअर पर्सन इंडक्शन ऑफिसर लायन डॉ. संजय पेन्सलवार उपस्थित होते.




# डॉ. मंगला वैष्णव यांनी गुंफले मेघ मल्हार व्याख्यानमालेचे तिसरे पुष्प

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक सेवाभावी संस्था, स्फूर्ती महिला मंडळ, आणि रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाउन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मेघ मल्हार व्याख्यान मालेचे तिसरे पुष्प गुंफण्यासाठी प्रा. मंगला वैष्णव यांचे "ज्येष्ठांनी मुलांशी कसे वागावे" या विषयावर व्याख्यान आयोजित केले होते. प्रगतीशील ज्येष्ठ नागरिक संस्थेचे अध्यक्ष भरत कुलकर्णी अध्यक्षस्थानी होते. रोटरी क्लब ऑफ औरंगाबाद मिड टाऊनच्या अध्यक्षा दिव्या मराठे , सचिव माधुरी काथार, कोषाध्यक्ष उल्हास मराठे, माजी अध्यक्षा ज्योती काथार, शोभना धारवाडकर, रामेश्वर पवार, विनोद शिनगारे, स्फूर्ती महिला मंडळाच्या अध्यक्षा मंजुषा कोरंगळीकर, प्रगतीशीलच्या उपाध्यक्षा विभा श्रीवास्तव आणि सचिव श्रीकांत पत्की या वेळी उपस्थित होते.

प्रार्थना झाल्यावर मान्यवरांच्या हस्ते, प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करण्यात आले. रो. सचिव माधुरी काथार यांनी स्वागतगीत सदर केले व त्यानंतर त्यांनी प्रा. मंगला वैष्णव यांचा सत्कार केला. इतर मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. मनोज देशमुख यांनी सूत्रसंचलन केले. ज्योती काथार यांनी प्रा. मंगला वैष्णव यांचा परिचय करून दिला. रो. शोभना धारवाडकर यांनी आभार प्रदर्शन केले. व्याख्यानमालेला मेघ मल्हार नाव ज्यांनी दिले त्यांचे प्रा. वैष्णव यांनी कौतुक केले.

मेघ मल्हार रागाविषयी त्यांनी माहिती दिली. कालिदासाचे मेघदूत हे काव्य आणि मेघ मल्हार याचा जवळचा संबंध आहे असे त्या म्हणाल्या. पुढे त्यांनी वृद्धत्व आणि ज्येष्ठत्व यातील फरक सांगितला. वृद्धत्व न मागता येते, ज्येष्ठत्व कमवावे लागते. वृद्धत्व परत जात नाही, ज्येष्ठत्व कधीही जाऊ शकते, वृद्धत्व सहज दिसते, ज्येष्ठत्व शोधावे लागते. वृद्धत्व प्रतिकूल परिस्थितीत खचते ज्येष्ठत्व आव्हाने स्वीकारून मिळते. वृद्धत्व दुर्मुखलेले असते, ज्येष्ठत्व प्रसन्न असते. वृद्धत्व इतरांचा आधार शोधते, ज्येष्ठत्व इतरांना आधार देते. वृद्धत्व दुर्लक्षित असते, ज्येष्ठत्व सन्मानित असते, वृद्धत्व लपवावे वाटते, ज्येष्ठत्व दाखवावे वाटते. वृद्धत्व चळते, ज्येष्ठत्व पळते, वळते वृद्धत्व अहंकारी, हेकेखोर असते, ज्येष्ठत्व नम्र, अनुभव संपन्न असते. वृद्धत्व व्यक्तिमत्व बिघडविते, ज्येष्ठत्व व्यक्तिमत्व घडविते , ज्येष्ठत्व धीरोदात्त असते, संयमी असते, विवेकी असते, अचूक निर्णय क्षमता असते, धृढनिश्चय, मनाची स्थिरता असते, प्रसन्न मनाने जगण्याची कला अंगीकारणे, षड्रीपुवर नियंत्रण, सहनशीलता असते, दुसऱ्यांच्यामतांचा आदर करतात, चुकीची कबुली देण्याचा प्रामाणिकपणा असतो, निराभिमानी, इतरांना आधार देणे अशी



लक्षणे असतात.

ज्येष्ठांनी आत्मशोध घ्यावा, गरजा मर्यादित ठेवाव्या, अति हव्यास घातक ठरू शकतो, तडजोड करावी, आपल्या काळातील गोष्टी सांगू नयेत, मनाने वानप्रस्थ स्वीकारावा. कमलपत्रवत राहावे, मुला सुनांना त्यांच्या जवाबदाऱ्या कळू द्याव्या, करू द्याव्यात, विचारले तरच सल्ला द्यावा, जशी जमेल तशी समाज सेवा करावी, नकारात्मक दृष्टीकोन ठेवू नये, वयाच्या आड लपू नये, सहानुभूतीची झोळी स्वीकारू नये, ज्येष्ठ वानप्रस्थाश्रमात असतो, उर्वरित आयुष्य समाज सेवेसाठी घालवावे.

ज्येष्ठ नागरिक संस्थांनी कसे कार्य करावे याबद्दल त्या म्हणाल्या एकत्र कुटुंबासारखी संस्था असावी, कृतिशीलता यावर भर द्यावा, सभासदांना संस्था आपली वाटावी, हे संस्थेचं वैशिष्ठ असावे. समाजाविषयी आस्था असावी, सर्वांनी मिळून मतभेदाविना उपक्रम घ्यावेत, आरोग्य विषयक, सामाजिक प्रश्न विषयक चर्चा व कृतिशीलता असावी, प्रत्तेक सभासदाला स्वतः चे म्हणणे सांगण्याची संधी दिली पाहिजे, निरनिराळे सण, उत्सव, जयंत्या, पुण्यतिथ्या, धर्मनिरपेक्षतेने साजरया करावयात, संस्कृती, देशप्रेम, भाषा प्रेम, कुटुंब प्रेम, टिकविण्या साठी कार्य करावे, सुसंवाद, प्रबोधन, जागृती, करमणूक, सभासदांच्या कलागुणांना वाव, सभासदांचा आत्मसम्मान संस्थेने जपावा, प्रत्तेक सभासद आनंदी आणि समाधानी असावा, छोट्या सहली, काढाव्या, एकत्र नाटक, सिनेमे बघावे व संस्था संघटीत करावी. असे शेवटी त्या म्हणाल्या.

# श्री शिवाजी विद्यालयात मातोश्री मुक्ताई पुण्यतिथी व कारगिल विजय दिन साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** श्री शिवाजी विद्यालय रांजणगाव (शे.पू .) ता. गंगापूर येथे आज 26 जुलै 2022 रोजी मातोश्री मुक्ताई धोंडगे पुण्यतिथी व कारगिल विजय दिन साजरा करण्यात आला. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक अनिलकुमार घारुळे हे होते. आज मातोश्री मुक्ताई यांच्या पुण्यतिथीनिमित्त प्रतीवर्षाप्रमाणे गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. मातोश्री मुक्ताई यांच्या कार्याचा गौरव सौ. वैशाली सपकाळ यांनी व्यक्त केला. कारगिल विजयी दिनानिमित्त सेवानिृत्त मेजर ज्ञानगिरी गिरी यांनी आपले कारगिल युध्दात आलेला अनुभव व्यक्त केला. या वेळी अनेक विद्यार्थी, विद्यार्थीनींची भाषणे झाली. मुख्याध्यापक अनिलकुमार घारुळे यांनी मातोश्री मुक्ताई उपेक्षित, दीनदुबळ्या, गरीब गरजू मुलांची आई म्हणून ओळखल्या जायच्या त्या आशिक्षित होत्या. तरी आपल्या मुलास वकील करण्याची त्यांची इच्छा होती. असे गौरव उद्गार काढले. तसेच कारगिल युद्धाबद्दल आपले मनोगत व्यक्त करून अध्यक्षिय समोरोप केला. यावेळी शालेय समिती सदस्य केशव पाटील नंदनवनकर, सोमीनाथ हिवाळे, अड. कल्याण पाटील, नारीशक्ती विकास महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ. सविता शिंदे उपस्थित होत्या. प्रास्ताविक रमा आडे यांनी केले. सूत्रसंचलन अनिल भांड यांनी केले तर आभार शिवकुमार होनराव यांनी व्यक्त केले.कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेतील शिक्षक सरोज पवार, सविता गोसावी, ज्योती भालेराव, आशा साळुंके, सुरेश सुलताने, भगवान वनारसे, सुरेश घोरबांड, संतोष बंडेवार, विजयसिंह परदेशी, दादासाहेब हजारे, ताराबाई हावरगे, सतीष जावळे यांनी सहकार्य केले.

# होल्डिंग हँड्स बहुद्देशीय संस्थेतर्फे जांभळा तांडा येथे शालेय साहित्य वाटप



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** होल्डिंग हँड्स बहुद्देशीय संस्थेतर्फे गंगापूर तालुक्यातील जांभळा तांडा, केंद्र आसेगाव येथील जिल्हा परिषद शाळेतील पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटपाचा कार्यक्रम नुकताच पार पडला. यावेळी वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजश्री आडे, होल्डिंग हँड्सचे संस्थापक अध्यक्ष सुरेश सिरसीकर, सरपंच चित्रा गणेश शेलार, उपसरपंच सचिन मंजुळ, ग्रामविकास अधिकारी किशोर गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हा परिषदेच्या सहशिक्षिका संध्या शिंगारे यांनी पाहुण्यांचे स्वागत केले. प्रस्ताविक होल्डिंग हँड्सचे उपाध्यक्ष रवींद्र बनकर यांनी केले तर सहशिक्षक कैलाश नाईक यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमाला पालक व ग्रामस्थ उपस्थित होते. या शैक्षणिक वाटपात वह्या, कंपासपेटी, रंगपेटी, खोड रबर, पेन्सिल व पेन सेट अशी मदत होती.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार अण्णा वैद्य, होल्डिंग हँड्सचे महारष्ट्र राज्य शिक्षण प्रमुख सुरेखा कलबुर्गे, जिल्हाध्यक्ष वर्षा जैन, सुवर्णा वनगुजर, रवींद्र बनकर, मंगला महाजन, आशिष वनगुजर, उमेश डोंगरे, शस्मिता डोंगरे, प्राची सिरसीकर, प्रतिभा शर्मा, महेश सिरसीकर, इंद्रकुमार जेवरीकर उपस्थित होते.

सुरेश सिरसीकर संस्थापक व अध्यक्ष असलेली औरंगाबादची होल्डिंग हँड्स बहुउद्देशीय संस्था. ही राज्यभरात आरोग्य, शिक्षण, पर्यावरण, सांस्कृतिक आणि सामाजिक बांधिलकी असलेले अनेक उपक्रम राबवित असते.

# शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा वाढदिवस विविध उपक्रमांनी साजरा



आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त संदेशनगर येथे राजूभाऊ वैद्य मित्र परिवारातर्फे वृक्षारोपणाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना विधानसभा संघटक पूर्व राजूभाऊ (रेणुकादास) वैद्य, शिवसेना उपजिल्हाप्रमुख संतोष जेजुरकर, शहरप्रमुख विश्वनाथ स्वामी, उपशहरप्रमुख संतोष खेडके, दिग्विजय शेरखाने, वामनराव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.यावेळी मा. नगरसेवक सूर्यकांत जायभाये, गजानन मनगटे, कांतीलाल निलपगारे, किसनराव गवळी, आबा शेळके, भगवानराव शिंदे, सखाराम जाधव , कारभारी चावरे, जनार्धन घोलप, प्रकाश गोरे, किसन लबडे, उत्तमराव खाडे, नारायण गोनेवाड, बाबुराव सोमसे, सुधाकर वाघचौरे, भीमराव अस्वार, ज्ञानेश्वर चव्हाण, धनराज बागुल, शिवसेना विभागप्रमुख राजू चव्हाण, बापू कवळे, अजय गटाने, पुरुषोत्तम पानपट, उपविभाग प्रमुख शेषराव कोरडे, प्रवीण सरोवर, विनोद पवार, दीपक पवार, शाखाप्रमुख राम केकान, कैलास तीवळकर, ज्ञानेश्वर साठे, दीपक संभेराव, भरत ढवळे, ईश्वर शिंदे, संदीप अहिरे, साईनाथ जाधव, गणेश कांबळे, अर्जुन सरोसे, राज नीळ, लक्ष्मण बताडे, गणेश जैस्वाल, धनराज बनस्वाल, सिद्धार्थ वाडमारे, अमोल देशमुख, हनुमान चव्हाण, नवनाथ घोडके, गजानन महाराज व्यापारी संघटनेचे जयंत देवळानकर, अनंत जैस्वाल, राजेंद्र गोसावी, लोकमान्य ब्लड बँकेचे रतीलाल चव्हाण, गणेश ठाकरे, शैलीत देशमुख, मयुरी तारो, भूषण सोनवणे, सुकन्या कुलकर्णी, योगेश पोपळघट महिला आघाडीच्या नैना डोईफोडे, शिला साळवे, लक्ष्मी सपकाळ, सीमा बरंडे, अनुजा सौंदनकर यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते

आरोग्याकडे दुर्लक्ष करु नका
आरोग्यम् धनसंपदा
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार
- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद



औरंगाबाद : येथील महावीर चौक बाबा पेट्रोल पंप लगत वाहतुकीला अडथळा करणारे एकूण बारा दुकानाचे रस्त्यावरील अतिक्रमण अनधिकृत बांधकाम आज हटविण्यात आले. यावेळी अतिरिक्त आयुक्त रविंद्र निकम, वाहतूक शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक नितीन कामे व इतर मनपाचे सर्व अधिकारी कर्मचारी छायाचित्रात दिसत आहे.

# देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे ऋक् श्रावणी उपाकर्म सोहळा

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळातर्फे ब्राह्मणांचा सर्वात मोठा उत्सव ऋक् श्रावणी उपाकर्म सोहळा (नुतन यज्ञोपवीत धारण विधी) दि. 3 ऑगस्ट रोजी शास्त्रीनगर हॉल, डॉ. हेडगेवार हॉस्पिटल च्या मागील गेटसमोर, शास्त्री नगर, औरंगाबाद येथे संपन्न होत आहे. या कार्यक्रमाचे हे दुसरे वर्ष आहे.

गेल्या वर्षी या कार्यक्रमाला समाजातर्फे उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला होता. देशस्थ ऋग्वेदी ब्राह्मण समाज मंडळाचे स्व. शंतनु चौधरी यांच्या प्रेरणेतून हा कार्यक्रम सुरू केला होता व त्यांच्या अचानक जाण्याने समाजाचे व मंडळाचे न भरून निघणारे नुकसान झाले आहे. त्यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ सार्वजनिक मुंजीचा कार्यक्रम अतिशय यशस्वीपणे पार पडला व याही कार्यक्रमाला समाजाकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. यामध्ये भाग घेण्यासाठी नाव नोंदवणे आवश्यक आहे. आपण खालील नंबरवर नाव नोंदणी करावी. यासाठी प्रत्येक सदस्यास स्वागत मुल्य रु.१०१ एवढे राहील. सदस्यांनी दि.३/०८/२०२२ रोजी सकाळी ७:०० ते ११:०० या वेळेत वेळेवर उपस्थित रहावे, या शुल्कात ब्राह्मण दक्षिणा, सभागृह, अभिमंत्रीत केलेले जानवे, चहा-नाष्टा तसेच पुजेला लागणारे साहित्य उपलब्ध करून दिले जाईल. (विधी साठी सोबत आणावयाचे साहित्य) सोवळे, उपवस्त्र, संध्यापात्र, फुलपात्र, पळी, कलश, ताम्हण, बसण्यासाठी आसन संपर्कासाठी प्रकल्प प्रमुख : डॉ. अमोल पांडव मो. 9420249112, रवी जेहुरकर मो. 9423782006, प्रशांत दाभाडकर मो. 9011556571, नरेश पटवर्धन मो. 7588076849, महिला पदाधिकारी मोनिका चौधरी, योगिनी देशमुख, मयुरी दाभाडकर, ऑनलाइन पेमेंटसाठी अंबादास कुलकर्णी मो. 9422293221 यांच्याशी संपर्क साधावा.

# मराठवाडा-विदर्भ सीमेवरील इसापूर प्रकल्पात ८९ टक्के जलसाठा

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** गत बारा-तेरा दिवसांपासून पाणलोट क्षेत्रात होत असलेल्या संततधार पावसाने मराठवाडा-विदर्भाच्या सीमेवरील पैनगंगा नदीवरील इसापूर धरणात पाण्याची मोठी आवक झाल्याने इसापूर धरणाच्या जलसाठ्यात ८९ टक्के एवढी मोठी वाढ झाली आहे. पाण्याची आवक पाहता नदीपात्रात विसर्ग करण्याच्या स्थितीत जलसंपदा विभागाने नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा दिला आहे.

पाणीपातळी सीमा जलसाठ्याने ओलांडल्यास अतिरिक्त पाणी नदीत सोडण्यात येणार आहे. त्यामुळे पुसद, उमरखेड, महागाव व कळमनुरी या तालुक्यातील नदीच्या काठावरील गावांतील नागरिकांना आपली गुरेढोर घरगुती व शेतीउपयोगी सामान सुरळीत स्थळी ठेवणे व सुरक्षितस्थळी राहणे याबाबतच्या सूचना देण्याबाबत संबंधित तहसीलदारांना देण्यात आल्याची माहिती पूरनियंत्रण अधिकारी तथा उपविभागीय अभियंता धुळगुंडे यांनी दिली. पावसाचा जोर पाहता धरणात पाण्याची मोठी आवक आहे. जलसाठ्याने ९१ टक्के प्रचलन पाणीपातळी ओलांडल्यास अतिरिक्त पाण्याचा नदीपात्रात विसर्ग करावा लागेल. त्यामुळे नदीकाठच्या गावांनी व लगतच्या शेतीत काम करणाऱ्या शेतकऱ्यांनी सतर्क राहावे. वेळोवेळी पूरनियंत्रण कक्षाकडून सावधानतेच्या सुचना देण्यात येत आहेत, अशी माहिती पूरनियंत्रण अधिकारी हनुमंत धुळगुडे पैनगंगा प्रकल्प, इसापूर धरण यांनी दिली आहे.






# माणुसकीची भिंत पुसद येथे दररोज गरजूंना होत आहे मोफत अन्नदान

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** आज दि.२७ रोजी सकाळचे अन्नदान दरवर्षी प्रमाणे याही वर्षी माणुसकीच्या भिंती पुसदला नेहमी मदत करून सहकार्य करणारे पुसद उपजिल्हा रुग्णालयाचे माजी वैद्यकीय अधिक्षक वर्ग एक चे हरिभाऊ फुपाटे यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त जेवण दिले.

पुसद उपजिल्हा रुग्णालय माणुसकीची भिंत मदत केंद्र येथे त्यांच्या हस्ते केक कापून सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना व तेथील गरजूंना पोळी, भात, भाजी, जिलेबीचे जेवण देण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर डॉ. कैलास राठोड वैधकीय अधिक्षक वर्ग एक पुसद उपजिल्हा रुग्णालय, माजी वैद्यकीय अधीक्षक वर्ग एक पुसद डॉ. पूनम चव्हाण, डॉ. वानोळे, डॉ. राकेश इंगळे, डॉ. रुणवाल, डॉ. देशमुख चौरे, अन्वर खान, कुणाल मस्के, बाबाराव उबाळे, राहुल गायकवाड, सुमेध इंगोले, शांतिसागर इंगोले, राहुल गायकवाड व माणुसकीची भिंतीचे गजानन जाधव, संतोष गावंडे, दत्ता जाधव, जगत रावल, दिपक घाडगे व रुग्णांचे नातलग व मान्यवरही उपस्थित होते.

# अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक सेवा सप्ताहाचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** महाराष्ट्र राज्याचे विरोधी पक्ष नेते तथा माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादी युवक काँग्रेस औरंगाबाद शहर जिल्हा यांच्या वतीने सामाजिक सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले त्यामध्ये 24 जुलै 2022 रविवार रोजी संजय नगर मुकुंदवाडी येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले. शिबिराचे आयोजन राष्ट्रवादी युवक क्रीडा समन्वयक सुशील अंभोरे व धम्मा गंगात्रिवे यांनी केले.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व महाकवी वामनदादा कर्डक यांच्या पुतळ्याला पुष्पहर अर्पण करून उदघाटन करण्यात आले. शिबिराचे उदघाटन शहर अध्यक्ष डॉ. मयूर सोनवणे आणि कार्याध्यक्ष कय्युम शेख यांनी केले. त्यांच्यासमवेत विशाल विराळे, हेमंत देशमुख, सुदर्शन बोडखे, दादासाहेब फल्ले, राम पंडित, ऋषीं खैरे, अयान पटेल व राष्ट्रवादी युवक काँग्रेस सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

शिबिर यशस्वी करण्यासाठी आकाश दिवेकर, विक्की लोखंडे, रोहित रनयेवले, अभय दाभाडे, सचिन काळे, तेजस इंगळे, गणेश घनसावध यांनी परिश्रम घेतले. शिबिरामध्ये संजय नगरमधील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मोफत तपासणी फोस्टर मेडिकल महाविद्यालय व हॉस्पिटल, डॉ. विजय वाकडकर यांच्या सर्व टीमने केले तसेच राष्ट्रवादी युवक काँग्रेस शहर अध्यक्ष डॉ. मयूर सोनवणे यांनी सांगितले की, औरंगाबाद शहरामध्ये प्रत्येक रविवारी अशा शिबिराचे आयोजन करण्यात येईल, नागरिकांच्या विविध अडचणी सोडवण्यात येतील.



वर्धा : मोळगाव बुद्रुक येथे आज रोजी वृक्षारोपण करताना मोळगाव चे सरपंच महेंद्र सर, सय्यद सर उर्फ बाबू भाऊ राजेंद्र पाटील, इंदर सिंग कछवा, ग्रामपंचायत कर्मचारी भगवान पाटील, गावकरी मंडळी यांच्या सहकार्याने मोळगाव येथे आज वृक्षारोपणाचे कार्यक्रम करण्यात आला. गावकऱ्यांचे मनपूर्वक धन्यवाद शंकर जाधव यांनी मानले.

शासन मान्यता प्राप्त लिलाव भिशी U65929MH2017PTC296394
दिंडोरी चिट फंड प्रा.लि.
आपले जीवन आनंदमय जगा....
तुमच्या बचतीवर योग्य गुंतवणूक हप्त्याने भरा आणि एक रक्कम पैसे मिळवा.
कमीत कमी व्याज दर योग्य मोबदला एक रक्कमी पैसे मिळवा आणि हप्त्याने परतफेड करा.
• सेंट्रल ॲक्ट १९८२ नुसार मान्यता प्राप्त
• पासबुक व पावतीची सोय
• लिलाव भिशी बोलीची मर्यादा ५% ते ४०% पर्यंत
• सर्व व्यवहार धनादेशाद्वारे
संपर्क: श्री.सतीष देशपांडे मो. 9730527669, 9623556611, 0240-2481122

# कोल्हापुरी बंधाऱ्यावरून विद्यार्थ्यांचा जीवघेणा प्रवास



## लोकप्रतिनिधी व प्रशासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** जिल्ह्यात सध्या पूराने थैमान घातले आहे. विशेषतः ग्रामीण भागातील रस्तेच बंद झाले आहे. मात्र, अशाही परिस्थितीत नागरिकांना जीव धोक्यात घालून वाट काढावी लागत आहे. मृत्यूशी झूंझतांनाचे ही जीवंत चित्र दारव्हा तालुक्यातील राजूरा गावाजवळून वाहणाऱ्या कुपटा नदीवरील आहे.

या नदीवर पुल आहे. मात्र, थोडासाही पूर येताच तो पाण्याखाली गडप होतो. अशावेळी नागरिकांना नदीवरच बांधलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यावरून जावे लागते. बंधाऱ्याच्या गेटसाठी सोडलेला तब्बल 4 ते 5 फुटांचा (गॅप) ओलांडण्यासाठी मात्र, जीव धोक्यात घालून उडी मारावी लागते. हातणी या गावात इयत्ता चौथीपर्यंतच शाळा असल्याने मुले दारव्ह्यातील शाळांमध्ये शिकतात. अनेकदा पाऊस सुरू झाला की त्यांना सुट्टी दिली जाते. मात्र, राजूरा गावाजवळील या पुलावरून पूर असल्यास शेवटी नाईलाजाने बंधाऱ्यावर चढावे लागते. शाळकरी मुले व महिलांसाठी काही नागरिक राजूरा गावातून पाटी आणून या बंधाऱ्याच्या गॅपमध्ये ठेवतात. त्यावर कोल्हाट्याच्या पोराप्रमाणे कसरत करत वाट काढावी लागते. पावसाळ्यात हातणीच्या शाळकरी मुलांसह नागरिकांसाठी हा जीवघेणा प्रवास नित्याचाच ठरला आहे. प्रशासनाने नागरिकांची ही समस्या निकाली काढावी, अशी मागणी आहे.

# रस्त्याअभावी रूग्णांची गैरसोय

## भोकर तालुक्यातील जाकापूर तांडा येथील प्रकार

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** तालुक्यात अतीवृष्टी झाल्याने रस्त्याची दयनीय अवस्था झाली आहे. जाकापुर तांडा (ता.भोकर) येथे रस्त्याअभावी ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. मंगळवारी (ता.२६) पावसाने रस्त्यावर चिखल साचल्याने आजारी रूग्णाची गैरसोय झाली. याची माहिती प्रशासनाला मिळताच गावात जाऊन त्या रूग्णांवर उपचार करण्यात आल्याने दिलासा मिळाला आहे.

तालुक्यात पावसामुळे रस्त्याची दुरवस्था झाली आहे. पाऊस काही उसंत घ्यायला तयार नाही. खरिप हंगामातील अंतर्गत कामे ठप्प झाली आहेत. शेतकरी आता मेटाकुटीला आल्याचे दिसून येत आहे. अतिवृष्टी झाल्याने अनेक कामाना फटका बसला आहे. बहुतांशी रस्ते पाण्याने खरडून गेली आहेत तर काही गावांना कच्चा रस्ता असल्याने ग्रामस्थांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते आहे. असाच काहिसा प्रकार तालुक्यात जाकापूर तांडा येथे घडला आहे. शहरापासून अवघ्या तीन ते चार किलो मीटर अंतरावर असलेल्या तांड्यावर जेमतेम वस्ती असून गावात जाण्यासाठी कच्चा रस्ता आहे.

> **जाकापुर तांडा येथे मंगळवारी आरोग्य विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबत घेऊन प्रत्यक्ष गावात भेट देऊन रुग्णांवर उपचार केले आहेत. तांड्यावर जाण्यासाठी कच्चा रस्ता आहे. पाणंद रस्त्यांसाठी निधी मंजूर झाला आहे. काही शासकीय अडचणी आहेत. त्या दूर झाल्यावरच कामाला सुरुवात केली जाणार आहे. याबाबत वरिष्ठांकडे चर्चा करून लवकरच रस्त्याचे काम मार्गी लागणार आहे.**
>
> **राजेश लांडगे**
> **तहसीलदार, भोकर**

पाऊस झाला की रस्त्यावर चिखल साचतो. त्यामुळे वाहनांना जाता येत नाही. मंगळवारी पाऊस झाल्याने आजारी रूग्णावर उपचार करण्यासाठी शहरात जाता येत नव्हते म्हणून तेथील ग्रामस्थांनी थेट उपविभागीय महसूल अधिकारी राजेंद्र खंदारे यांच्याशी संपर्क साधून माहिती दिली. याची तात्काळ दखल घेऊन त्यांनी तहसीलदार राजेश लांडगे, आरोग्य विभागाचे अधिकारी, परिचारिका यांना घेऊन गावात जाऊन आजारी रूग्णावर उपचार केल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे.

# सलग तीस वर्षे वि.का.का.सोसायटी बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज



**औराळा :** तालुक्यातील गुदमा गावातील तीस वर्षाची परंपरा सुरू ठेवत विविध कार्यकारी सोसायटी निवडणूक गुदमा गावातील ग्रामस्थांच्या सहकार्याने बिनविरोध करण्यात आली.

गुदमा गावच्या विविध कार्यकारी सोसायटीच्या चेअमनपदी बिनविरोध नारायण राठोड व व्हॉईस चेअमनपदी दिलीप जाधव यांची बिनविरोध निवड करण्यात आली तसेच अनिल राठोड, ताराचंद पवार, कैलास राठोड, अरविंद चव्हाण, नीलाबाई राठोड, छांगीबाई राठोड, नवनाथ जाधव, शामराव राठोड, निलेश राठोड यांची ग्रामस्थांच्या वतीने गुदमा गावच्या विविध कार्यकारी सोसायटी वर बिनविरोध निवड करण्यात आली. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने सर्वांचा सत्कार करण्यात आला यावेळी कचरू राठोड, धर्मु जाधव, गणपत राठोड, लिमचंद पवार, अनिल जाधव, एकनाथ जाधव, गल्लू जाधव, ताराचंद राठोड व समस्त ग्रामस्थ गुदमा व परिसरातील लोक उपस्थित होते.



# उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसानिमित्त जि.प.प्रा शाळा औराळा येथे शैक्षणिक साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील औराळा येथे माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने जि.प.प्रा. शाळा औराळा शाळेत शैक्षणिक साहित्याचे माजी जिल्हा परिषद सदस्य डॉ. अण्णासाहेब शिंदे यांच्यावतीने शंभर विद्यार्थ्यांना रजिस्टर व पेनाचे वाटप करण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना डॉ. अण्णासाहेब शिंदे बोलताना म्हणाले की, अलीकडच्या काळात वाढदिवस साजरा करणे म्हणजे एक रिवाज बनला आहे. परंतु यातूनही काही सामाजसेवक अलोकिक स्वरूपात वाढदिवस साजरा करतात. विनाकारण होणाऱ्या खर्चाला फाटा देऊन समाज उपयोगी काही करत येते का यांचे चिंतन करून त्यास मूर्त स्वरुप देण्याचा काम विविध सामाजिक उपक्रमाच्या माध्यमातून एक नवा आदर्श राजकारण्यांसाठी माजी मुख्यमंत्री तथा शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी घालून दिला आहे, असे शिंदे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

यावेळी शिवसेना विभाग प्रमुख काकासाहेब काळे, युवा सेना तालुका उपप्रमुख भारत मिसाळ, युवा सेना विभाग प्रमुख योगेश पवार, सरपंच चंद्रकांत बागुल, औराळी गावचे सरपंच कडूबा कुमावत, शाखाप्रमुख सतीश जिवरख, रमेश वारे, मुख्याध्यापक पवार, शिक्षक प्रधान, मुळे आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होते.




# आर्यन मिश्रा निर्मित "अटल सन्मान" चे टायटल गीत लॉंच

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** संगीतकार दिलीप सेन, गीतकार लता हया, विशेष पाहुणे बीएन तिवारी, अभिनेता अरुण बक्षी, गायक सत्यम उपाध्याय हे देखील उपस्थित होते. व्हीके मिश्रा (आर्यन), दिग्दर्शक, आर्यन एम फिल्म प्रॉडक्शन निर्मित, "अटल सन्मान २०२२" चे शीर्षक गीत २६ जुलै रोजी कारगिल विजय दिवसानिमित्त स्टुडिओ वन, मुंबई येथे भव्य पद्धतीने लॉंच करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पद्मश्री सोमा घोष होते तर विशेष अतिथी बीएन तिवारी (एफडब्ल्यूआयसीईचे अध्यक्ष) होते. सेलिब्रेटी पाहुणे आरती नागपाल, अरुण बक्षी, राजू टांक सिंगर उपस्थित होते. या गाण्याचे संगीतकार दिलीप सेन, गीतकार लता हया आणि गायक सत्यम उपाध्याय हेही येथे उपस्थित होते. सत्यम उपाध्याय यांच्या आई डॉ. सविता उपाध्याय या शिक्षणतज्ज्ञ, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्त्या यावेळी उपस्थित होत्या. आर्यन मिश्रा पुढील महिन्यात अटल सन्मान २०२२ पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करणार आहे. यापूर्वी त्यांनी श्री नारी सन्मान आयोजित केला आहे.

व्हीके मिश्रा आर्यन यांनी सांगितले की, आम्ही मुंबईत पहिल्यांदाच श्री नारी शक्ती सन्मान पुरस्कार शो केला जो खूप यशस्वी झाला. आता ऑगस्टमध्ये अटल सन्मान २०२२ होणार आहे, त्याचे शीर्षक गीत दिलीप सेन यांनी सुंदर संगीतबद्ध केले आहे तर लता हया यांनी ते भावनेने लिहिले आहे. सत्यम उपाध्याय यांनी हे गाणे आपल्या सुरेल आवाजात मोठ्या उत्साहाने गायले आहे.

अटल सन्मानाचे शीर्षकगीत येथे कथन करण्यात आले, ज्याला सर्वांनी चांगला प्रतिसाद दिला. बीएन तिवारी यांनीही आर्यन मिश्राला शुभेच्छा दिल्या आणि गाणे खूप प्रेरणादायी असल्याचे वर्णन केले. पद्मश्री पुरस्कार विजेते सोमा घोष यांनी या सुंदर गाण्याच्या लॉंचिंग प्रसंगी सांगितले की, आर्यन मिश्राने अतिशय सुंदर संकल्पनेतून अटल सन्मान या शीर्षक गीताची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे. संगीतकार दिलीप सेन यांनी सुंदर संगीत दिले आहे आणि लता हया यांचे लेखन अप्रतिम वाटते आणि या तरुण वयात गुरुग्रामहून आलेल्या सत्यम उपाध्याय यांनी अप्रतिम गायन केले आहे.

बीएन तिवारी म्हणाले की, आर्यन मिश्रा यांचे सौभाग्य आहे की सोमा घोष जी आज येथे आले. त्यांच्या आशीर्वादाने हे गाणे लॉन्च झाले ही मोठी गोष्ट आहे.

सेलिब्रिटी गेस्ट अभिनेत्री आरती नागपालने गाण्याचे कौतुक केले आणि आर्यन मिश्राच्या भावनेला सलाम केला. १५ ऑगस्ट आणि २६ जानेवारीलाही हे देशभक्तीपर गीत वाजवण्यात येणार असल्याचे ते म्हणाले. आर्यन मिश्राच्या या गाण्याला अरुण बक्षी यांनीही दाद दिली आणि सत्यम उपाध्यायच्या आवाजाला मीडिया आणि उपस्थित सर्व मान्यवरांनी पसंती दिली.

दिलीप सेन यांनी आर्यन मिश्राचे आभार मानले आणि सांगितले की हे गाणे खूप खास आहे जे लता हया यांनी प्रभावीपणे लिहिले आहे. सत्यम उपाध्याय यांनी हे आव्हानात्मक गाणे अतिशय उत्तमरित्या वाजवले असून माध्यमांशी संवाद साधताना सत्यम म्हणाले की, अटलजींसारख्या महान व्यक्तिमत्त्वासाठी गाणे गाणे ही माझ्यासाठी अभिमानाची बाब आहे.

अटल सन्मान शून्य ते शिखर तक २०२२ पुढील महिन्यात आयोजित करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या जनसंपर्काची जबाबदारी रमाकांत मुंडे (मुंडे मीडिया) यांनी पार पाडली.


पुस्तके खरेदीची सुवर्णसंधी

आपल्या पुस्तकाच्या संग्रहात अमुल्य भर घाला



३ पुस्तकांचा संच मिळवा १०००/- रुपयांत

पुस्तकांवर 20% सूट



गणिताच्या मूलभूत संकल्पना
(१ली ते १०वी व सर्व परीक्षांसाठी उपयुक्त)
~~MRP ₹ 430/-~~ Offer Price ₹ 345/-
पाने ५३४

गणिताच्या मूलभूत संकल्पना प्रश्नसंच
सर्व शालेय विद्यार्थी, शिष्यवृत्ती परिक्षार्थी व सर्व स्पर्धा परीक्षांना उपयुक्त
~~MRP ₹ 470/-~~ Offer Price ₹ 375/-
पाने ५३४

उखाण्यातून गणित
मुलभूत संकल्पना व जनरल नॉलेज
~~MRP ₹ 360/-~~ Offer Price ₹ 280/-
पाने ३६४

श्रीमती छायाताई खेडकर
8888780568

श्री. हरिभाऊ गिते सर
9422742712

गणेश बुक स्टॉल,
भगवानबाबा चौक, पाण्याच्या टाकीजवळ, बीड
मो. 8149196415

दत्तराज पार्क,
बायपासरोड, सावतानगर, गेवराई
मो. 8888780568/9422742712

माऊली अपार्टमेंट,
मंगलमुर्ती कॉलनी, रेणू हॉस्पिटल जवळ,
धाडेनगर, बार्शी रोड, बीड मो. 8793150910

# रस्त्यावरील खड्डे पॅचेसने बुजवणे गुत्तेदारांसाठी झाले भ्रष्टाचाराचे अड्डे

आधुनिक केसरी न्यूज

**सुनिल सिरसाट**

**अंबाजोगाई :** रस्त्यावरील खड्डे पॅचेसच्या रूपात बुजवणे म्हणजे संबंधित गुत्तेदारासाठी ते भ्रष्टाचाराचे आड्डे झाले असून ते एक प्रकारचे खुडन केंद्र बनल्याचे एकंदरीत चित्र पाहता स्पष्टपणे दिसून येत आहे. भगवानबाबा चौक ते आंबेडकर चौक दरम्यान एक किलोमीटर अंतरातील जागोजाग असणारे शेकडो खड्डे एक-दोन पाऊस पडताच आणखीनच उघडले गेल्याने यादरम्यान प्रवास करणे जीव घेणे बनले होते.

**जीवघेणे खड्डे बुजवले खरे परंतु आठवड्यातच ते पुन्हा जैसे थे झाल्याने वाहनधारकांची जीवघेणी कसरतः सां. बा. विभागाला नेमके किती जीव गेले म्हणजे माणसाची किंमत कळेल आणि संबंधित गुत्तेदाराला सां.बा.विभाग दंड करेल....?**




भगवानबाबा चौक ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक दरम्यानच्या एक-सव्वा किलोमीटर अंतरात गतवर्षीच काम केलेले असताना सुद्धा शेकडो खड्डे पडले होते. पावसाळा अगदी तोंडावर येऊन पोहोचला तरी पण एक खड्डाही बुजवला जात नव्हता. परंतु दै.आधुनिक केसरी आणि बी.एम.न्यूज चॅनलने याकडे लक्ष वेधले असता सां.बा.विभागाने तात्काळ खड्डे बुजवले खरे, परंतु हे जीवघेणे खड्डे केवळ आठवडाभरच समाधान देऊन गेले. डांबराचा लवलेशही यामध्ये न वापरल्याने आणि नियमाप्रमाणे कसलेही मटेरियल न वापरल्याने केवळ खडी व कचकडी टाकून थातूरमातूर भरलेले हे खड्डे पुन्हा जीव घेण्यास सज्ज असल्याचे चित्र रोजच्या ये-जा प्रवासाने स्पष्टपणे दिसून येत आहे.

**माण-पाठ-कंबर दुखीसह मणक्यांच्या ईतरही आजारात प्रचंड वाढ....!**

भगवानबाबा चौक ते आंबेडकर चौक दरम्यान असलेल्या खड्ड्यांमुळे प्रवास जीवघेणा तर झालाच आहे. परंतु दर दोन-पाच सेकंदाला सातत्याने आदळ आपट होत असल्याने या एक ते सव्वा किलोमीटरच्या प्रवासातच मोटरसायकल स्वार एवढे थकून जात आहेत. तर अनेकांना पूर्वीच असलेल्या हलक्या मान-पाठ-कंबर दुखीच्या आजारामुळे आता आणखीनच दुखणे बळावले असून मणक्यांच्या इतर आजारातही मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने या रस्त्यावरून ये-जा करणारा प्रवासी आता चातक पक्षी ज्याप्रमाणे पावसाची वाट पाहतो त्याप्रमाणे हा रस्ता कधी एकदाचा चांगल्या दर्जाचा होतो याची वाट पाहत आहे. परंतु सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालय, आंबेजोगाई आणि त्याचे अभियंता यांना याचे काही देणे-घेणे नसून माणसे मेले तरी चालतील. आमच्यापर्यंत टेबलाखालून आले पाहिजे आणि गुत्तेदाराचेही भले झाले पाहिजे या एकमेव चांगभले धोरणाने याकडे कुणाचेच तीळमात्र लक्ष नसल्याने आता तालुक्याचे मायबाप तहसीलदार-उपजिल्हाधिकारी यांनी तरी याकडे गांभीर्याने पाहावे आणि हा रस्ता अंदाजपत्रकाप्रमाणे करून घेऊन संबंधित गुत्तेदारावर तात्काळ दंडात्मक कारवाई करावी अशा मागणीचा सूर संपूर्ण आंबेजोगाई शहरात ऐकावयास मिळतो आहे. तेंव्हा तालुक्याचे मायबाप अधिकारी आता याकडे नेमके किती व कसे लक्ष देणार याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

# मोलखेडा ते हिवरी रस्त्यावर विद्यार्थ्यांचा ठरतोय जीवघेणा प्रवास; रस्त्याला आले पाणंद स्वरूप

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील मोलखेडा ते हिवरी येथील दोन किलोमीटरचा रस्त्याचे उद्‌घाटन सुद्धा तत्कालीन राज्यमंत्री अब्दुल सत्तार यांच्या हस्ते करुन आणि मंजूर करण्यात आले आहे. पण दोन वर्षे झाले आहे मुहूर्त काही निघेना अखेर मोलखेडा येथून हिवरी येथे जाणाऱ्या रस्त्यावर सध्या मोठ मोठे खड्डे पडल्याने पूर्ण चिखलमय रस्ता होऊन पांदण रस्त्याचे स्वरूप आले आहे. ग्रामीण भागात असल्याने इकडे कोणी नेतेमंडळी फिरुन पाहायला तयार नाहीत.

मोलखेडा, हिवरी व महाल्बा परिसरातील वाहनधारकांना, रुग्णांना, विद्यार्थी, कर्मचारी व विद्यार्थी यांना या रस्त्यावर मोठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. रस्त्यात खड्डे की खड्डयात रस्ता, का चिखलात खड्डा आहे हे एक न उलगडणारे कोडे पडले आहे. या चिखलामुळे दिवसेंदिवस अपघातात वाढ होत असून फर्दापूर सार्वजनिक बांधकाम संबंधीत प्रशासन मात्र जाणूनबुजून झोपेचे सोंग घेऊन दुर्लक्ष करत असल्याने मोलखेडा व हिवरी येथील गावकऱ्यांमध्ये संताप व्यक्त केला जात आहे. गेल्या अनेक दिवसांपासून खड्डे, खड्डेच व चिखलमय आहेतच. शेजारच्या शेतकऱ्यांना सुद्धा या चिखल व पाण्यामुळे नाहक त्रास सोसावा लागत आहे. हे जर पाणी शेतात गेले पिंकाचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान होऊ शकते. तर या २ किमी रस्त्याच्या अंतराचे अनेक वर्षापूर्वी डांबरीकरण व मजबुतीकरण झालेले नाही. अगोदर किमान मजबुतीकरण व डांबरीकरण करुन रस्त्याची डागडूजी करावी, अशी मागणी परिसरातील शेतकरी व वाहनधारकांमधून होत आहे.



**दररोज विद्यार्थ्यांना, ग्रामस्थांना मोलखेडा, घाणेगांव, देवळगांव (गुजरी), सावळदबारा येथे जावे लागते आणि शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांना ये जा करण्यासाठी मोठी कसरत करावी लागत आहे. पाण्यामुळे खड्डाचा आणि चिखलाचा अंदाज येत नाही म्हणून छोटीमोठी वाहने खाली पडत आहे. संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभाग फर्दापूर यांनी त्वरित लक्ष घालावे. ग्रामस्थांना व वाहनधारकांना होणार त्रास दूर करावा.**

**अतुल इंगळे व अमोल शेळके**
**ग्रामपंचायत सदस्य मोलखेडा ता.सोयगाव**

**रस्त्यात मोठमोठे खड्डे पडल्यामुळे त्यात पावसाचे पाणी साचते आणि रस्ता दिवसेंदिवस चिखलमय होत चालला आहे. साधी मोटारसायकल सुद्धा या रस्त्यावर चालवता येत नाही. यामुळे वाहनधारकांना चिखलाचा व खड्डयांचा अंदाज येत नाही. यात अनेक नागरिक जखमी झाले आहे. लवकरात लवकर तो दुरुस्त करावा अन्यथा रस्ता रोको करण्यात येईल, अशा इशारा देखील मोलखेडा, हिवरी येथील ग्रामस्थ यांनी दिला आहे.**

**मनिषाताई ज्ञानेश्वर वारंगणे**
**सरपंच, मोलखेडा ता. सोयगाव**

# श्रीं च्या पालखीचे आज लोणार शहरात आगमन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणार :** संत गजानन महाराज पालखी सोहळा व दिंडीचे पंढरपूर येथून शेगावला परतीचा प्रवास असून किनगाव जट्टू किन्ही या मार्गाने



दिंडी मार्गक्रमण करत लोणार शहरात आज दि.28 जुलै रोजी दुपारी चार वाजेदरम्यान दाखल होणार असून यावेळेस प्रथमच संत गजानन महाराज दर्शन सोहळा व वारकऱ्यांचा विसावा शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरील लोणी रोड येथे बायपास जवळ निर्माणाधीन दि ग्रँड विश्वनाथ मंगल कार्यालय येथे होत आहे.

सदर पालखी पंचायत समिती जवळील स्वातंत्र्य मैदानातून निघत पोलीस स्टेशन, जामा मस्जिद चौक, बस स्टॅन्ड चौकावरून शेगाव पंढरपूर राष्ट्रीय महामार्गावरून हिरडव चौक खटकेश्वर, नगर लोणी बायपासवरून दि ग्रँड विश्वनाथ मंगल कार्यालय लोणार येथे विसावा घेणार आहे. येथेच भाविकांना संत गजानन महाराज यांच्या दर्शनाचा सोहळा अनुभवता येईल व याच ठिकाणी वारकऱ्यांचे रात्रीची मुक्कामाची सोय करण्यात आली आहे. तरी या बदलाची सर्व गजानन भक्तांनी नोंद घेण्यात यावी, असे आवाहन या पालखीचे सेवेकरी विलास भागवतराव इरतकर, करण कैलासराव इरतकर परिवारातर्फे करण्यात आले आहे.

# आपल्या थोड्याशा दुर्लक्षामुळे गोमातेचा मृत्यू व्हावा हे अप्रत्यक्षरित्या पापच : ॲड.अशोक मुंडे

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथे पहाटे 5 च्या वेळी अज्ञात वाहनाच्या धडकेत दोन वासराचा अपघात झाला असल्याची माहिती बस वाहक फड यांच्याकडून मिळल्याने त्याठिकाणी पोहचल्यास व जखमी वासरांना पाहिल्यास मनुष्य इतका निष्ठुर कसा होऊ शकतो हे अद्यापही मला उमजले नाही असे भावनाद्‌गार मुंडे यांनी काढले.

अपघात ईतका भीषण होता की, त्यांना दवाखान्यात किंवा उपचारासाठी संधी ही



नाही मिळाली. बघता-बघता जीव गेला. त्यांची आई हंबरडा फोडत होती. पण आज आह्मी हताश होतोत. इच्छा असताना सुद्धा काहीही नाही करू शकलो. शेवटी विनोद लोमटे, अरुण मोरे काका, शंतनू दादा हेराळकर, रविकिरण मोरे या सर्वांच्या मदतीने त्यांचा विधीवत अंत्यविधी केला.

**ॲड.अशोक मुंडेचे हात जोडून आवाहन**

पुढे ॲड.अशोक मुंडे म्हणाले, माझी विनंती आहे सर्वांना की, यापुढे असे अपघात टाळण्यासाठी किमान रस्त्याच्या कडेला बसलेल्या वासरांना, गाईंना



रस्त्यावरून बाजुला तरी काढा-हाकला. जेणेकरून आपण त्यांचा जीव तरी वाचवू शकू आणि असे यापुढील आपल्या परिसरातील प्रसंग तरी टाळू शकू. तेंव्हा थोड्याशा हईगईमुळे वा दुर्लक्षामुळे असे न पाहवणारे प्रसंग उद्‌भवतात. त्यामुळे बेपर्वाई नकोच अशी भावना यावेळी लोकनेते स्व.गोपीनाथरावजी मुंडे गोशाळेचे प्रवर्तक ॲड.अशोक मुंडे यांनी व्यक्त केली.

# सुखी जीवनाचा मंत्र





डॉ. विजय दहिफळे

## पुरुषांमधील लैंगिक दोष...

आधुनिक केसरी

**इंटरसेक्स :** बाळ जन्माला आल्यानंतर त्याच्या लिंगाचा आकार अर्धवट किंचा संमिश्न असल्यास त्वरित युरॉलॉजिस्ट व सेक्सॉलॉजिस्ट यांचा सल्ला घ्यावा. लहान मुलांमध्ये प्रामुख्याने अशा पद्धतीचे दोष आढळून येतात. आता आपण पुन्हा एकदा मोठ्या पुरुषांमधील दोषांसदर्भात जाणून घेऊया.

**कॉर्डर्डी ऑफ पेनिस :** ज्या पुरुषांच्या अवयवात जन्मजात वाकडेपणा येत असतो त्याला कॉर्डी ऑफ पेनिस असे म्हणतात. जन्मतःच काही लिंगे ही आकाराने लहान आणि त्वचेला चिकटलेली असतात त्यामुळे असे लिंग कठोरता आली की एका बाजूला झुकतात. वेळीच शस्त्रक्रिया करून हा दोष नाहीसा करता येतो.

**हायपोगोनॅडिजम :** काही हार्मोनल प्रॉब्लेम्समुळे अवयवाची योग्य वाढ होत नाही यालाच हायपोगोनॅडिजम म्हटलं जातं. हार्मोनल ट्रीटमेंट आणि शस्त्रक्रिया यांच्या माध्यमातून याही दोषांवर मात करता येते.

**व्हेरिकोसिल :** वंध्यत्व येण्यासाठी असलेल्या कारणांपैकी व्हेरिकोसिल हेसुद्धा एक कारण आहे. या दोषामध्ये अंडाशयाची नस आकाराने वाढते यामुळे वीर्याची गुणवत्ता घटून शुक्राणू कमी होणे, कमकुवत होणे किंवा पूर्णपणे नसणे अशा व्याधी उत्पन्न होतात आणि वंध्यत्व येते. यावर उपाय म्हणून जर मायक्रो सर्जरी केली तर वंध्यत्व निवारण होऊ शकते.

पुरुषांमध्ये आढळणाऱ्या अशा किती तरी दोषांवर, समस्यांवर रामबाण इलाज उपलब्ध आहेत. गरज आहे ती ज्ञानी होण्याची. आपल्याला कोणती तरी लैंगिक समस्या आहे आणि त्याकरिता मी तज्ज्ञ अशा सेक्सॉलॉजिस्टला दाखवणे गरजेचे आहे याची जाणीव होणे आवश्यक आहे. **(क्रमशः)**

संपर्क : डॉ. दहिफळे युरॉलॉजी ॲण्ड प्लास्टीक सर्जरी हॉस्पीटल, जिल्हा न्यायालयासमोर, अदालत रोड, बाबा पेट्रोल पंपाजवळ, औरंगाबाद, मोबा. : 9822326248, फोन 0240-2364858
Email : drvijaydahiphale@gmail.com,
Website : www.dahiphalecosmeticurology.com

# रामदास मन्नूलाल वर्मा यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** एन -९, एम -२, २/१, संत ज्ञानेश्वर नगर, हडको, औरंगाबाद येथील रहीवासी रामदास मन्नूलाल वर्मा (परदेशी) यांचे आज सकाळी वाजता अल्पशा आजाराने इस्पितळात निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज दि.२७ रोजी एन- ११ येथील स्मशानभूमीत दुपारी ३ वाजता अंतिम संस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा व तीन मुली नातवंडे असा परीवार आहे. परिसरात व एपीआय कंपनीतील कर्मचाऱ्यांमध्ये ते सुपरिचीत होते. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.



काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in